कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

महाराष्ट्र शासन द्वारा स्थापित, यूजीसी मान्यताप्राप्त, नॅक बी$^{++}$ श्रेणीप्राप्त

मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र

महाराष्ट्र राज्यात संस्कृत शिक्षण आणि संस्कृत संवर्धनासाठी १८ सप्टेंबर १९९७ रोजी नागपूर जिल्ह्यात रामटेक येथे कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना झाली. महाराष्ट्र शासन स्थापित, यूजीसी मान्यताप्राप्त, नॅक बी$^{++}$ श्रेणीप्राप्त संपूर्ण महाराष्ट्रात केवळ एकमेव संस्कृत विश्वविद्यालय आहे. विश्वविद्यालय अनुदान आयोगाच्या दूरस्थ शिक्षा परिषदेकडून २०१९ साली कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्राला मान्यता प्राप्त झाली आहे (F.No. १-११/२०१९). मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्राद्वारे अधोनिर्दिष्ट अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे. सर्व अभ्यासक्रमांना दूरस्थ शिक्षण केंद्राकडून मान्यता प्राप्त असून जानेवारी आणि जुलै अश्या दोन सत्रात प्रवेश देण्यात येत आहे.

P.G. Courses

Sr. No.	Course	Eligibility	Duration
1.	M.A. Sankrit	Graduation in any discipline from any recognized university	2 years (4 Semesters)
2.	M.A. Yogashastra		

Diploma Courses

Sr. No.	Course	Eligibility	Duration
3.	Diploma in Sankrit Agama	H.S.C. or it's Equivalent	2 years (4 Semesters)
4.	Diploma in Yoga Application		
5.	Diploma in Early Childhood Care Education		

Certificate Courses

Sr. No.	Course	Eligibility	Duration
6.	Certificate course in Spoken Sanskrit	S.S.C. or it's equivalent	6 months
7.	Certificate course in Sanskrit writing		
8.	Certificate course in Geeta		
9.	Certificate course in Yoga Setu	H.S.C.	3 months

कु. रेणुश्री बनसोड
सहायक प्राध्यापिका
मो. 9370530313

कु. श्रीवरदा माळगे
सहायक प्राध्यापिका
मो. 9970502670

~ संपर्क ~
डॉ. हृषीकेश दलाई
संचालक, मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र
कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक,
मौदा रोड, रामटेक-441106, जि. नागपूर (महाराष्ट्र)
मो. 8087650981
Ramtek : Ph. & Fax 07114-255549, 255787
Web Site : www.kksanskrituni.digitalunivercity.ac
E-mail : kksuodl@gmail.com



MAY-1-I-01

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

महाराष्ट्र शासन द्वारा स्थापित, यूजीसी मान्यताप्राप्त, नॅक बी$^{++}$ श्रेणीप्राप्त

एम.ए. योगशास्त्र

प्रथम सत्र - प्रथम प्रश्नपत्र

संस्कृत - ०१



प्रकाशक

मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक,
मौदा रोड, रामटेक-441106, जि. नागपूर (महाराष्ट्र)

MAY-1-I-01

कविकुलगुरु–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः, रामटेकम्

महाराष्ट्र शासन द्वारा स्थापित, यूजीसी मान्यताप्राप्त, नॅक बी++ श्रेणीप्राप्त

प्रधान संपादक

प्रो. श्रीनिवास वरखेडी

मा. कुलगुरु

संपादक

डॉ. कलापिनी अगस्ती

विभाग प्रमुख,

भारतीय दर्शन विभाग

कार्यकारी संपादक

डॉ. हृषीकेश दलाई

संचालक

मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र

एम.ए. योगशास्त्र

प्रथम सत्र – प्रथम प्रश्नपत्र

संस्कृत – ०१

प्रकाशक

मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

मौदा रोड, रामटेक–४४११०६, जि. नागपूर (महाराष्ट्र)

विषय विशेषज्ञ समिति
१. प्रा. मधुसूदन पेन्ना, अधिष्ठाता - भारतीय तत्वज्ञान व संस्कृती संकाय, क.का.सं.वि.
२. डॉ. कलापिनी अगस्ती, विभाग प्रमुख, भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि.
३. डॉ. रेणुका करंदीकर, सहायक प्राध्यापक, भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि.
४. प्रा. श्रद्धा उपाध्ये, सहायक प्राध्यापक, भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि.
५. प्रा. सचिन डावरे, सहायक प्राध्यापक, भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि.
६. डॉ. धीरजकुमार पाण्डेय, सहायक प्राध्यापक, भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि.
७. प्रा. रेणुश्री बनसोड, सहायक प्राध्यापक, भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि.
८. प्रा. मिथिलेश भाकरे, सहायक प्राध्यापक, भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि.

पाठ्यसामग्री लेखक
प्रकरण १ – रघुवंशम् :– रघूवंशम् भाषांतर संकलन–कालिदास समग्र साहित्य, क.का.सं.वि. प्रकाशन
प्रकरण २ – कर्णभारम् :– डॉ. मृदुला काळे, परीक्षित झोडेकर
प्रकरण ३ – संस्कृतनिबन्धाः :– डॉ. धीरजकुमार पाण्डेय

सह–संपादक
१) प्रा. रेणुश्री बनसोड, सहायक प्राध्यापक, मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र
२) प्रा. श्रीवरदा माळगे, सहायक प्राध्यापक, मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र

ISBN - 978-93-85710-67-4

प्रकाशक – संचालक, मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र, क.का.सं.वि. रामटेक

अक्षररचना/मुद्रक
युरो वर्ल्ड पब्लिकेशन, नागपूर. मो. – ८७८८९६४८२६

संपर्क :–
संचालक,
मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र
कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
मौदा रोड, रामटेक–४४११०६, जि. नागपूर (महाराष्ट्र)
Ph. & Fax ०७११४-२५५५४९, २५५७८७
Web Site : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
E-mail : kksuodl@gmail.com, odl@kksu.org

मा. कुलगुरुंचे मनोगत

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्राद्वारे संस्कृत आणि योगशास्त्र या दोन विषयांमध्ये पदव्युत्तर पदवीची परिनिष्ठित अध्ययन सामग्री प्रकाशित करण्यात येत आहे.

संस्कृत–भिन्न क्षेत्रातील जिज्ञासूंना भारतीय विद्यांचे आकर्षण आहे. विशेषत: संस्कृत शिकण्याची इच्छा आहे, परंतु कार्यव्यवधान वा अन्य कारणाने ते नियमित रूपात संस्कृताध्ययन करू शकत नाही. अशा सर्व जिज्ञासूंसाठी मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्राद्वारे संस्कृत व योगशास्त्र या विषयांमध्ये एम्. ए. अर्थात् पदव्युत्तर पदवीशिक्षणाचा प्रारंभ सत्र २०२०–२१ पासून होत आहे. सद्य:स्थितीत बदललेल्या अध्ययनसंस्कृतीत सर्वांनाच आवडत्या विषयाचे शिक्षण घेणे सुलभ व सुकर होणार आहे. मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्राद्वारे विश्वविद्यालयाच्या शिक्षणाची व्याप्ती विस्तृत होईल. दूर राहून देखील मुक्त व दूरस्थ शिक्षण व्यवस्थेत आता ऑनलाईन शिक्षण तंत्रज्ञानाची सहाय्यता प्राप्त होणार आहे. त्यामुळे गुणवत्तेत कोणतीही न्यूनता राहणार नाही.

सदर अभ्यासक्रम प्रथम स्थानिक भाषेत अर्थात् मराठीत आणि टप्याटप्याने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि संस्कृत भाषेत उपलब्ध होतील. विभिन्न क्षेत्रातील जिज्ञासूंद्वारे संस्कृत भाषा विविध क्षेत्रातील लोकांपर्यंत तर पोहचेलच, परंतु ती क्षेत्रेही प्रभावित करेल असा मला विश्वास आहे. संस्कृत तथा प्रांतीय भाषा यांचा संबंध दृढ करण्यास हा प्रयत्न महत्त्वपूर्ण सिद्ध होईल.

या अभ्यासक्रमाची अध्ययन सामग्री साहित्य आणि योग विभागांतील प्राध्यापकांच्या परिश्रमाने तयार करण्यात आली आहे. या अध्ययन सामग्रीच्या प्रकाशनासाठी अविश्रांत परिश्रम घेणाऱ्या संपादक मंडळ, लेखक आणि मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्र संचालक डॉ. हृषीकेश दलाई, प्रा. श्रीवरदा माळगे आणि प्रा. रेणुश्री बनसोड यांचे मी अभिनंदन करतो.

प्रो. श्रीनिवास वरखेडी

कुलगुरु

अनुक्रमणिका

१. रघुवंशम् ७–२८

१.१ प्रस्तावना
१.२ उद्देश
१.३ रघुवंशाच्या प्रथमसंर्गाची कथावस्तु
१.४ प्रथम सर्गाचे भाषांतर
१.५ कालिदासाने अल्पमतीचे केलेले वर्णन
१.६ रघूवंशाचे वर्णन
१.७ वसिष्ठाश्रमाच्या मार्गाचे वर्णन
१.८ आश्रमाचे वर्णन
१.९ दिलीपराजाचा राज्यकारभार
१.१० दिलीपराजाच्या संततिहीनत्वाचे दु:ख
१.११ दिलीपराजाच्या संतति हीनतेचे कारण
१.१२ कामधेनूच्या सेवेचे वर्णन
१.१३ दिलीप वसिष्ठ संवाद
१.१४ अपेक्षित प्रश्नसंच
१.१५ संदर्भ ग्रंथसूची

२. कर्णभारम् २९–४१

२.१ प्रस्तावना
२.२ उद्देश
२.३ कवि भासाची काव्यशैली
२.४ महाभारतातील आख्यान आणि कर्णभार
२.५ मूळस्रोतांपासून कथेचे अंतर
२.६ कर्णभाराचे कथानक
२.७. कर्णभाराचे भाषांतर
२.८ चरित्र–चित्रण
 १ कर्ण
 २ शल्यराज
 ३ इंद्र
२.९ कर्णभाराच्या शीर्षकाचे महत्त्व
२.१० अपेक्षित प्रश्नसंच
२.११ संदर्भ ग्रंथसूची

३ संस्कृतनिबन्धाः ४२–४६

३.१ प्रस्तावना
३.२ उद्देश

३.३ भारतीयसंस्कृतेः महत्त्वम्
३.४ महाकाव्यानि
३.५ पर्यावरणम्
३.६ शिक्षा – आयोगा :
३.७ आर्षकाव्ये
३.८ दीपावली
३.९ संस्कृतभाषा
३.१० देशभक्तिः
३.११ संस्कृते विज्ञानम्
३.१२ ग्रन्थालयमहत्त्वम्
३.१३ अपेक्षित प्रश्नसंच
३.१४ संदर्भ ग्रंथसूची

१. रघुवंशम्

१.१ प्रस्तावना

''**कविता कामिनी चा विलास**'' म्हणून प्रसिध्द असलेला कविकुलगुरू कालिदास विरचीत ''रघुवंश'' हे महाकाव्य परंपरेतील एक महत्वपूर्ण महाकाव्य आहे. या महाकाव्यातील उपमांमुळेच कालिदासांना 'उपमा कालिदासस्य' ही उपाधी प्राप्त झाली आहे 'रघुवंशम्' या महाकाव्या मध्ये रघुवंशाचे यथार्थ वर्णन कालिदासाने केलेले आहे. म्हणूनच ''रघुकार कालिदास'' असेही म्हणतात.

रघुवंश या महाकाव्यात एकूण १९ सर्ग आहेत, यात रघुवंशातील प्रथम राजा दिलीप असून दिलीप, रघु, अज, दशरथ, राम, लव, कुश, अतिथि करुन तसेच इतर एकूण २० राजांचे वर्णन केलेले आहे. राजा अग्निवर्ण यांच्या भोग विलासाचे वर्णन करून या महाकाव्याचा शेवट करण्यात आलेला आहे. रघुवंशम् या महाकाव्याची सुरूवात इक्ष्वाकु कुळातील राजा दिलीप पासून होते.

कविकुलगुरू कालिदास हे भारतीय साहित्य परंपरेत अग्रस्थानी आहेत. अनेक परावर्ती आचार्य व साहित्यिकांनी कालिदासाचे श्रेष्ठत्व मान्य केले आहे. इतर अनेक संस्कृत आचार्यांप्रमाणे कालिदासाच्या काळ व स्थानाबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही पण असे अनेक ग्रंथाचे अन्तर्गत पुरावे व इतर घटकांचे अध्ययन केल्यावर कालिदासाचा काळ हा 'विक्रमादित्य' म्हणजे चंद्रगुप्त द्वितीयचा काळ निश्चित करण्यात आलेला आहे. म्हणजेच इ. स. ३७५ ते ४१५ होय. कालिदासाच्या एकूण सात (७) कलाकृती प्रसिध्द आहेत.

नाटक – विक्रमोर्वशीयम्, मालविकाग्निमित्रम् व अभिज्ञान – शाकुन्तलम्

खण्डकाव्य – ऋतुसंहार व मेघदूतम्

महाकाव्य – कुमारसंभवम् व रघुवंशम्

कालिदास हा संस्कृत कवींमध्ये सर्वश्रेष्ठ मानला जातो. प्रसन्न राघव नाटक लिहिणाऱ्या जयदेवाने कालिदासाला 'कविकुलगुरु' म्हटले आहे. शेझी हा फ्रेंच कवी कालिदासाच्या अभिज्ञान शाकुन्तल नाटकाचे भाषांतर डोक्यावर घेवून नाचला, तर जर्मनीचा महाकवी गटे याने शाकुन्तलाचे जर्मन भाषांतर वाचून 'स्वर्ग व पृथ्वी यांचा संगम एकत्र झालेला पहायचा असेल तर शाकुन्तलात पहा असे उद्गार त्याने काढले.

कालिदास नक्की केव्हा होऊन गेला हा मतभेदाचा विषय आहे. तरी याबद्दल दोन मते प्रचलित आहेत.

१) विक्रमादित्याच्या इ. स. पू. १ शतक

२) इ.स. च्या चवथ्या शतकात उत्तरार्धात द्वितीय चन्द्रगुप्ताच्या वेळी

कालिदासाने 'कुमारसंभवम्' 'रघुवंशम्' ही दोन उत्कृष्ट महाकाव्ये, मालविकाग्निमित्रम्, विक्रमोर्वशीयम् अभिज्ञान, शांकुन्तलम्, नाटके, ऋतुसंहार आणि मेघदूत ही खंडकाव्ये लिहिलीत.

१.२ उद्देश

१. कालिदासाचा परिचय करून देणे.

२. कालिदासाच्या उपमांचे ज्ञान करून देणे.

३. रघुवंशाच्या प्रथम सर्गातील मुख्य विषयांचे ज्ञान करून देणे.

१.३ रघुवंशाच्या प्रथमसंर्गाची कथावस्तु

१. शिवपर्वतीला नमस्कार करून सुरू होणारे मंगलाचरण.

२. राजा दिलीपाच्या मनुवंशाचा उत्पात.

३. दिलीपराजाच्या कीर्तिचे वर्णन.

४. निपुत्रिक असलेल्या दिलीपराजाचे पुत्रप्राप्तीसाठी राणीसाहित वसिष्ठाश्रमाकडे प्रयाण.

५. वसिष्ठ ऋषिंना राजाने दुःख कथन करणे.

६. वसिष्ठ ऋषि दिव्यज्ञानाद्वारे दिलीपराजाच्या निपुत्रिक असण्याचे कारण जाणतात आणि राज्याच्या पूर्वजन्मीचा वृत्तांत कथन करतात.

७. इन्द्रलोकातून परतताना कामधेनुची प्रदक्षिणा न केल्याने मिळालेल्या शापाची आठवण ऋषि करून देतात.

८. कामधेनुच्या पुत्रपूजेशिवाय दिलीपराजाला संततिप्राप्ती अशक्य असण्याचे वर्णन.

९. आकाशगंगेत दिग्गाजांच्या स्नानकरण्याच्या ध्वनीमुळे दिलीपराजाला शापवाणी ऐकू न येणे.

१०. वरूणाच्या यज्ञात कामधेनु आणि तिची पुत्री नन्दिनी वसिष्ठामुनींकडे असल्याचे वर्णन.

११. तिची विधिवत सेवा करण्याचे आदेश वसिष्ठ ऋषी देतात.

१२. अशाप्रकारे सेविलेली ती गोमाता मनोरथ पूर्ण करेल असे ऋषीद्वारा दिले गेलेले आश्वासन इ. चे सविस्तरवर्णन, ही रघुवंशाच्या प्रथम सर्गाची कथावस्तु आहे.

'माहिषं दधिः सर्शकरं पयः, कालिदासकविता नवं वयः' अशी सूक्ती प्रसिद्ध आहे. कालिदास साहित्याशिवाय संस्कृत काव्यांची कल्पना करणे अशक्य आहे. रामायण, महाभारतासारखी प्रसिद्धी कालिदासाहित्यास प्राप्त आहे. संस्कृतवाङ्मयाच्या विकासक्रमात महाकवी कालिदासाचे योगदान चिरस्मरणीय आहे. **'यावदेव महत्त्वं वै व्यासवाल्मीकिनां पुरा। तावदेव चिरं भाति कालिदासो महान्कविः'** असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. समग्र भारताची सांस्कृतिक ओळख महाकवी कालिदासाने आपल्या समग्र काव्यातून अभिव्यक्त केली आहे. वैदिक सनातन धर्माची आस्था, श्रद्धास्थाने, संस्कृती, यज्ञपरम्परा यांचा सार्थक उल्लेख त्याच्या पात्रांद्वारे करण्यास तो विसरत नाही.

प्रस्तुत 'रघुवंशम्' या महाकाव्याद्वारे कालिदसाने भारतखण्डाचा राजनैतिक, इतिहास, प्राचीन भारतीय समाज, संस्कृती व परंपरांचे सुंदर वर्णन केले आहे. महाकाव्य लक्षणांस अनुसरून **'एकवंशभवाः भूपाः'** यात वर्णिले आहेत. इक्ष्वाकु वंशाच्या सुमहान् परंपरेचे वर्णन करतांना त्याने काव्यातील आस्वाद्य वस्तु भव्य व हृद्य वनविली आहे. **'रघूणामन्वयं वक्ष्ये तनुवाग्विभवोऽपि सन्'** असे म्हणत विशाल १९ सर्गाचे हे महाकाव्य त्याने रचले. **दीपशिखा कालिदासं** ही पदवी याच काव्याद्वारे त्याला प्राप्त झाली. राजा दिलीप, रघु, अज इत्यादि सर्व रघुवंशीय राजांचे वर्णन करतांना त्याने प्रथमसर्गात दर्शविलेला **'शैशवेऽभ्यस्तविद्यानां....'** हा क्रम सूत्रबद्ध पद्धतीने अवलंबिला आहे. रघुकुलभूषण रामाच्या वर्णनात राम आणि सीता यांच्या आदर्शवादाचे निरूपण करावयास तो विसरला नाही. खूप काय सांगावे, 'रघुवंशम्' म्हणजे मानवीयता व सत्यता या दोन निकषांचा समन्वय साधणारी महाकवीची अनुपम रचना आहे.

१.४ प्रथमः सर्गः

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ।।१।।

शब्द आणि अर्थ यांचे सम्यक ज्ञान प्राप्त व्हावे याकरिता, शब्द आणि अर्थ यांच्याप्रमाणे (परस्परांपासून भिन्न असूनही) परस्परांशी निगडित असलेल्या, अखिल विश्वाचे जनक-जननी असणाऱ्या अशा पार्वती आणि परमेश्वर यांना मी प्रणाम करतो.

क्वसूर्यप्रभवो वंशः क्वचाल्पविषया मतिः ।
तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ।।२।।

कोठे सूर्यापासून झालेला हा रघुवंश आणि कोठे अल्पमती असलेला मी? जणू मी अज्ञानाने एखाद्या लहानशा होडीने दुस्तर असा महासागर तरून जाण्याची इच्छा करीत आहे.

मन्दः कवियशः प्रार्थी गमिष्याम्युपहास्यताम् ।
प्रांशुलभ्ये फले लोभादुद्बाहुरिव वामनः ।।३।।

सुमार बुद्धी असूनही मोठमोठ्या कवींना प्राप्त होणारे यश मिळविण्याची इच्छा धरली तर ते उंच मनुष्याच्या हाती येणाऱ्या फळाच्या अपेक्षेने एखाद्या वामन मूर्तीने हात वर करावेत याप्रमाणे हास्यास्पद होईल.

अथ वा कृतवाग्द्वारे वंशेऽस्मिन्पूर्वसूरिभिः ।
मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गतिः ।।४।।

अथवा प्राचीन महाकवींनी आपल्या वाग्वैभवाने रघुवंश वर्णनात प्रवेश केलेलाच असल्यामुळे छेज पाडलेल्या मण्यात सूत्राला ज्याप्रमाणे सहज प्रवेश करता येतो त्याप्रमाणे मला देखील येथे मार्ग काढता येईल.

सोऽहमाजन्मशुद्धानामाफलोदयकर्मणाम् ।
आसमुद्रक्षितीशानामानाकरथवर्त्मनाम् ।।५।।
यथाविधिहुताग्नीनां यथाकामार्चितार्थिनाम् ।
यथापराधदण्डानां यथाकालप्रबोधिनाम् ।।६।।
त्यागाय संभृतार्थानां सत्याय मितभाषिणाम् ।
यशसे विजिगीषूणां प्रजायै गृहमेधिनाम् ।।७।।
शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् ।
वार्द्धके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ।।८।।
रघूणामन्वयं वक्ष्ये तनुवाग्विभवोऽपि सन् ।
तद्गुणैः कर्णमागत्य चापलाय प्रचोदितः ।।९।।

म्हणूनच जरी माझे वाग्वैभव बेताचेच असले तरी त्यांच्या गुणांनी कानांशी येऊन असेल धाडस करण्याची प्रेरणा दिल्यामुळे मी जन्मापासून शुद्ध असणाऱ्या, फलप्राप्ती होईपर्यंत कार्य संपन्न करत राहणाऱ्या, सागराच्या सीमेपर्यंत विस्तार असणाऱ्या, रथाची गती स्वर्गापर्यंत असणाऱ्या, यथाविधी यज्ञयाग करणाऱ्या, याचकांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या, अपराधानुरूप यथायोग्य शासन करणाऱ्या, योग्य काळी सावधानता बाळगणाऱ्या, सत्पात्री दान देण्याच्या उद्देशानेच धनसंचय करणाऱ्या, केवळ सत्याकरिताच मित भाषण करणाऱ्या, कीर्ती करिता दिग्विजय करणाऱ्या, संततीकरिता गृहस्थाश्रम स्वीकारणाऱ्या, बालपण विद्यार्थिदशेत व्यतीत करणाऱ्या, तारूण्यात विलास भोगणाऱ्या, वृद्धापकाळी वानप्रस्थाश्रम स्वीकारणाऱ्या आणि अखेर योगबलाने देह त्याग करणाऱ्या, अशा रघूच्या वंशाचे मी वर्णन करतो.

तं सन्तः श्रोतुमर्हन्ति सदसद्व्यक्तिहेतवः ।
हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा ।।१०।।

हे वर्णन चांगल्या वाईटाची पारख असलेल्यांनी ऐकावे कारण सोन्याचा चोखपणा व हिणकसपणा अग्नीत तावून सुलाखून निघाल्यानंतरच प्रत्ययास येतो.

वैवस्वतो मनुर्नाम माननीयो मनीषिणाम् ।
आसीन्महीक्षितामाद्यः प्रणवश्छन्दसामिव ।।११।।

वेदांमध्ये ज्याप्रमाणे प्रणव अर्थात ओंकार प्रथम आहे त्याप्रमाणे विद्वानांस पूज्य असा विवस्वताचा पुत्र मनू हा पृथ्वीवरील पहिला राजा होऊन गेला.

तदन्वये शुद्धिमति प्रसूतः शुद्धिमत्तरः ।
दिलीप इति राजेन्दुरिन्दुः क्षीरनिधाविव ।।१२।।
व्यूढोरस्को वृषस्कन्धः शालप्रांशुर्महाभुजः ।
आत्मकर्मक्षमं देहं क्षात्रो धर्म इवाश्रितः ।।१३।।
सर्वातिरिक्तसारेण सर्वतेजोभिभाविना।
स्थितः सर्वोन्नतेनोर्वी क्रान्त्वा मेरूरिवात्मना ।।१४।।

आकारसदृशप्रज्ञः प्रज्ञया सदृशागमः ।

आगमैः सदृशारम्भ आरम्भसदृशोदयः ।।१५।।

क्षीरसमुद्रात ज्याप्रमाणे चंद्र उत्पन्न झाला त्याचप्रमाणे त्यांच्या त्या शुद्ध कुळात अत्यंत सात्त्विक असा दिलीप नामक राजश्रेष्ठ जन्मास आला.

रुंद छातीचा, वृषभाप्रमाणे खांदे असलेला, शालवृक्षाप्रमाणे उंच आणि दीर्घ बाहू असणारा असा तो दिलीप म्हणजे जणू साक्षात् क्षात्रधर्मच स्वतःच्या कर्मानुरूप देह धारण करून भूमीवर अवतरला होता.

सर्वांपेक्षा अधिक असलेल्या बळाने, सर्वांना दीपवून टाकणाऱ्या तेजाने आणि सर्वांपेक्षा उंच आणि धिप्पाड असलेल्या शरीरयष्टीने तो मेरू पर्वताप्रमाणे सर्व सृष्टीला व्यापून राहिला होता.

त्याची बुद्धी त्याच्या शरीरयष्टीला साजेशी होती, शास्त्राभ्यास हा बुद्धीला अनुकूल होता, त्याचा व्यवसाय हा अभ्यासानुरूप होता आणि त्याला त्याच्या व्यवसायानुरूप फलप्राप्ती होत होती.

भीमकन्तैर्नृपगुणैः स बभूवोपजीविनाम् ।

अघृष्यश्वाभिगम्यश्च यादोरत्नैरिवार्णवः ।।१६।।

समुद्र ज्याप्रमाणे त्यातील मकरादी प्राण्यांमुळे भीतिप्रद वाटतो व त्यातील रत्नांमुळै हवाहवासा वाटतो त्याचप्रमाणे आपल्या प्रतापादि उग्र गुणांमुळे प्रजेत त्याचा दरारा होता आणि कुलशीलादि दाक्षिण्यामुळे तो प्रजेला आदणीय वाटत असे.

रेखामात्रमपि क्षुण्णादा मनोर्वर्त्मनः परम् ।

न व्यतीयुः प्रजास्तस्य नियन्तुर्नेमिवृत्तयः ।।१७।।

कुशल सारथ्याच्या रथाची चाके ज्याप्रमाणे चाकोरी सोडून जात नाहीत त्याचप्रमाणे रूढ मार्गाचा अवलंब करणारी त्याची प्रजा मनूपासून चालत आलेल्या मार्गापासून भर देखील ढळली नाही.

प्रजानामेव भूत्यर्थं स ताभ्यो बलिमग्रहीत् ।

सहस्त्रगुणमुत्स्त्रष्टुमादत्ते हि रसं रविः ।।१८।।

तो राजा प्रजेच्या कल्याणाकरिता व्यय करण्यासाठीच प्रजेकडून कर घेत असे. साहजिकच आहे सूर्य सुद्धा पर्जन्याच्या रूपाने हजारो पटींनी परत करण्याच्या उद्देशानेच पृथ्वीपासून जलाचे शोषण करतो.

सेनापरिच्छदस्तस्य द्वयमेवार्थसाधनम् ।

शास्त्रेष्वकुण्ठिता बुद्धिर्मौर्वी धनुषि चातता ।।१९।।

दिलीपाचे सैन्य त्याला केवळ राजचिन्हाप्रमाणे असे, कारण कोणत्याही परिस्थितीतून मार्ग काढण्याचे त्याचे दोन उपाय होते. एक शास्त्रात सर्वगामी बुद्धी आणि दुसरे प्रत्यंचा चढविलेले धनुष्य.

तस्य संवृतमन्त्रस्य गूढाकारेङ्गितस्य च ।

फलानुमेयाः प्रारम्भाः संस्काराः प्राक्तना इव ।।२०।।

राजकारणप्रकरणी त्याचे विचार व कृती गुप्त असल्यामुळे पूर्वजन्मीच्या संस्कारांप्रमाणे फळांकडे बघूनच त्यांच्या कार्याचे अनुमान करावे लागे.

जुगोपात्मानमत्रस्तो भेजे धर्ममनातुरः।

अगृध्नुराददे सोऽर्थमसक्तः सुखमन्तभूत्।।२१।।

तो निर्भयपणे स्वसंरक्षण करी निकोप मनाने धर्माचे आचरण करी, निरभिलाष बुद्धीने द्रव्य संपादन करी, आणि अनासक्त राहून सुखोपभोग घेत असे.

ज्ञाने मौनं क्षमा शक्तौ त्यागे श्लाघाविपर्ययः।

गुणा गुणानुबन्धित्वात्तस्य सप्रसवा इव।।२२।।

ज्ञानी असूनही मौनी असणारा, शक्तिमान असूनही क्षमाशील असणारा तो, दातृत्व असूनही प्रौढी न मिरवणारा असा होता. त्याचे हे परस्परविरोधी गुण जणू जुळ्या भावंडाप्रमाणे एकत्र नांदत होते.

अनाकृष्टस्य विषयैर्विद्यानां पारदृश्वनः।
तस्य धर्मरतेरासीद्धत्वं जरसा विना ।।२३।।

दिलीप हा सुखदुःखादि विषयांच्या आधीन नसल्याने, वेद वेदाङ्गादि विद्यापारंगत असल्याने व धर्मासक्त असल्यामुळे त्याला म्हातारपणाशिवाय वृद्धत्व प्राप्त झाले होते. (तो तारुण्यातच ज्ञानवृद्ध झाला होता.)

प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणादपि।
स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः।।२४।।

दिलीपाच्या प्रजेकरिता आई वडील हे केवळ जन्मदाते म्हणून होते. कारण आपल्या प्रजेला शासनपद्धतीने नीतिशिक्षण देणारा, त्यांचे संरक्षण करणारा आणि त्यांचे पोषण करणारा तोच त्यांचा पिता होता.

स्थित्यै दण्डयतो दण्ड्यान्परिणेतुः प्रसूतये।
अप्यर्थकामौ तस्यास्तां धर्म एव मनीषिणः।।२५।।

समाजधारणेकरिताच तो अपराध्यांना दंड करीत असल्यामुळे व केवळ संतत्यर्थच विवाह करीत असल्यामुळे त्याचे काम व अर्थ हे धर्मच होते (टीप. अनासक्त राहून आपापल्या गुण कर्मानुसार कर्तव्य पार पाडल्यास ते मनुष्याला बंधनकारक होत नाही. तो त्यांचा धर्मच आहे अशी गीतेची ही शिकवण आहे.)

दुदोह गां स यज्ञाय सस्याय मघवा दिवम्।
सम्पद्विनियमयेनोभौ दधतुर्भुवनद्वयम्।।२६।।

दिलीप राजा यज्ञाकरिताच करग्रहणाच्या रूपाने वसुंधरेचे दोहन करीत असे व त्यांच्या राज्यातील पिके वाढावीत म्हणून पर्जन्य रूपाने इंद्र स्वर्गाचे दोहन करीत असे. अशारीतीने दोघेही आपापल्या संपत्तीची परस्पर देवाण घेवाण करून दोन्ही लोकांचे पोषण करत असत (टीप. यज्ञातील हविर्भागाचा श्रेष्ठ मान इंद्राचा असतो यावरून यज्ञ हा इंद्राला संतुष्ट करण्याकरिता केला जातो असे म्हणण्यास हरकत नाही. तसेच तो यज्ञाने संतुष्ट झाला असता पर्जन्य पाडतो हेहि प्रसिद्धच आहे).

न किलानुययुस्तस्य राजानो रक्षितुर्यशः।
व्यावृत्ता यत्परस्वेभ्यः श्रुतौ तस्करता स्थिता।।२७।।

प्रजेचे रक्षण करणाऱ्या त्या राजाच्या यशाचे दुसऱ्या राजांना अनुकरण देखील करता येत नसे कारण त्यांच्या राज्यात चौरकर्म विन्मुख झाल्यामुळे चोरी हा शब्द प्रजेला ऐकूनच माहिती होता.

द्वेष्योऽपि सम्मतः शिष्टस्तस्यार्तस्य यथौषधम्।
त्याज्यो दुष्टः प्रियोऽप्यासीदङ्गुलीवोरगक्षता।।२८।।

आजारपणात ज्याप्रमाणे मनुष्य औषध कडू असले तरी स्वीकारतो त्याचप्रमाणे एखादा शत्रू जरी विद्वान असेल तरी त्याला मान्य होता. तसेच एखादा मनुष्य प्रिय असूनही जर तो दुष्ट असेल तर सर्पदंश झालेल्या अंगुलीप्रमाणे तो त्याला त्याज्य असे.

तं वेधा विदधे नूनं महाभूतसमाधिना।
तथा हि सर्वे तस्यासन्परार्थैकफला गुणाः।।२९।।

विधात्याने खरोखरच त्याला पंचमहाभूतांचे सत्त्व एकवटून निर्माण केले होते कारण पंचमहाभूतांप्रमाणेच त्याचे देखील सर्व गुण केवळ परोपकारार्थ होते.

स वेलावप्रवलयां परिखीकृतसागराम्।
अनन्यशासनामुर्वीं शशासैकपुरीमिव।।३०।।

समुद्ररूपी खंदकांनी आणि समुद्रकिनारारूपी तटांनी वेढलेल्या पृथ्वीवर ते जणू एकच नगर आहे असे भासावे असा एकछत्री कारभार तो करीत होता.

तस्य दाक्षिण्यरूढेन नाम्ना मगधवंशजा।
पत्नी सुदक्षिणेत्यासीदध्वरस्येव दक्षिणा।।३१।।

यज्ञाची जशी दक्षिणा ही अभिन्न सहचरी तशीच त्या राजाची आपल्या स्वभाव दाक्षिण्यामुळे प्रसिद्ध असलेली सुदक्षिणा नामक मगधकुलोत्पन्न पत्नी होती.

कलत्रवन्तमात्मानमवरोधे महत्यपि।
तया मेने मनस्विन्या लक्ष्म्या च असुधाधिपः।।३२।।

दिलीप राजाचा अंतः पुरवर्ग मोठा असला तरी राजा त्या मनस्विनी सुदक्षिणेमुळे आणि राज्य लक्ष्मीमुळेच स्वतःला सपत्नीक समजत असे.

तस्यामात्मानुरूपायामात्मजन्मसमुत्सुकः।
विलम्बितफलैः कालं स निनाय मनोरथैः।।३३।।

आपल्या मनाजोगत्या पत्नीपोटी आपल्याला पुत्रप्राप्ती होईल या आशेत त्याने पुष्कळ दिवस काढले.

सन्तानार्थाय विधये स्वभुजादवतारिता।
तेज धूर्जगतो गुर्वी सचिवेषु निचिक्षिपे।।३४।।

अखेर संततीप्राप्तीसाठी अनुष्ठान करण्याच्या उद्देशाने त्याने आपल्या राज्यकारभाराची अवजड धुरा आपल्या खांद्यावरून उतरविली आणि प्रधानांवर सोपवली.

अथाभ्यर्च्य विधातारं प्रयतौ पुत्रकाम्यया।
तौ दम्पती वसिष्ठस्य गुरोर्जग्मतुराश्रमम्।।३५।।
स्निग्धगम्भीरनिर्घोषमेकं स्यन्दनमास्थितौ।
प्रावृषेण्यं पयोवाहं विद्युदैरावताविव।।३६।।

नंतर पुत्रप्राप्तीची मनीषा धरून इंद्रियनिग्रहपूर्वक ब्रह्मदेवाचे पूजन करून ते जोडपे वसिष्ठ ऋषींच्या आश्रमात जावयास निघाले.

वर्षा काळातील मेघा वर विद्युत व ऐरावत असावेत त्याप्रमाणे मधुर आणि गंभीर आवाज असणाऱ्या रथांत ती दोघे बसली.

मा भूदाश्रमपीडेति परिमेयपुरः सरौ।
अनुभावविशेषात्तु सेनापरिवृताविव।।३७।।
सेव्यमानौ सुखस्पर्शैः शालनिर्यासगन्धिभिः।
पुषपरेणूत्किरैर्वातैराधूतवनराजिभिः।।३८।।
मनोभिरामाः श्रृण्वन्तौ रथनेमिस्वनोन्मुखैः।
षड्गसंवादिनीः केका द्विधा भिन्नाः शिखण्डिभिः।।३९।।
परस्पराक्षिसादृश्यमदूरोज्झितवर्त्मसु।
मृगद्वन्द्वेषु पश्यन्तौ स्यन्दनाबद्धदृष्टिषु।।४०।।
श्रेणीबन्धाद्वितन्वद्भिरस्तम्भां तोरणस्रजम्।
सारसैः कलनिर्हादैः क्वचिदुन्नमिताननौ।।४१।।
पवनस्यानुकूलत्वात्प्रार्थनासिद्धिशंसिनः।
रजोभिस्तुरगोत्कीर्णैरस्पृष्टालकवेष्टनौ।।४२।।
सरसीष्वरविन्दानां वीचिविक्षेभशीतलम्।
आमोदमुपजिघ्रन्तौ स्वनिः श्वासानुकारिणम्।।४३।।
ग्रामेष्वात्मविसृष्टेषु यूपचिह्नेषु यज्वनाम्।
अमोघाः प्रतिगृह्णन्तावर्घ्यानुपदमाशिषः।।४४।।
हैयङ्गवीनमादाय घोषवृद्धानुपस्थितान्।

नामधेयानि पृच्छन्तौ वन्यानां मार्गशाखिनाम्।।४५।।
काऽप्यभिख्या तयोरासीद्व्रजतोः शुद्धवेषयोः।
हिमनिर्मुक्तयोर्योगे चित्राचन्द्रमसोरिव।।४६।।

आश्रमवासियांना त्रास होऊ नये या उद्देशाने अत्यंत अल्प सेवकांना बरोबर घेतले असले तरी ते त्यांच्या तेजोविशेषांमुळे सैन्याने वेढलेले असल्यासारखे दिसत होते.

शाल वृक्षांवरून आल्यामुळे सुगंधित झालेला, परागकण उडविणारा, वनराजीला डोलविणारा आल्हाददायक वायू भक्षण करीत.

रथांच्या खडखडाटाने वर मान करून षड्ज स्वरात निघाणाऱ्या कानाला सुमधुर भासणाऱ्या मयूराच्या केका ऐकत.

वाटेतून फार दूर न जाता रथाकडे एकटक बघणाऱ्या हरणांच्या जोडीच्या डोळ्यात आपापल्या डोळ्यांचे सादृश्य पाहत.

एका रांगेत उडत असल्यामुळे आधाररहित असलेल्या व तोरणाप्रमाणे दिसणाऱ्या सारसांच्या अस्पष्ट पण मधुर आवाजामुळे किंचित मान वर करून पाहात.

मनोरथ नक्की पूर्ण होणार असे सुचविणाऱ्या, अनुकूल वाऱ्यामुळे उडणाऱ्या आणि घोड्यांच्या खुरांनी उधळलेल्या धुराळ्याने ज्यांचा केशकलाप व शिरोभूषणे ही किंचित् देखील मळलेली नाहीत अशी ती दोघे.

लाटांच्या तरंगांमुळे शीतल झालेला आणि आपल्या (सुगंधी) श्वासांचे अनुकरण करणारा तलावातील कमळांचा सुवास सेवन करीत.

यज्ञयागाकरिता आपण दिलेल्या यूपचिन्हांनी युक्त असलेल्या गावांतील या करणाऱ्यांकडून हे अर्ध्य यानंतर विफल होणार नाही असे आशीर्वाद स्वीकारीत. (टीप. यूप म्हणजे यज्ञात उभारण्यात येणारा लाकडी खांब.)

ताजे तूप-लोणी घेऊन आलेल्या वृद्ध गवळ्यांना रस्त्याच्या कडेला असणाऱ्या वन्य वृक्षांची नावे विचारीत.

ती दोघे झगझगीत वेष परिधान करून चालली असता हिवाळा सरल्यानंतर चित्रा व चंद्र यांचा योग व्हावा त्याप्रमाणे त्यांची विशेष शोभा दिसत होती.

तत्तद्भूमिपतिः पत्न्यै दर्शयन्प्रियदर्शनः।
अपि लङ्घितमध्वानं बुबुधे न बुधोपमः।।४७।।

बुधाप्रमाणे दर्शनीय आणि ज्ञानी असणारा तो राजा आपल्या पत्नीला निरनिराळ्या गोष्टी दाखवत मार्गक्रमण करीत असता त्यांचा मार्ग केव्हा संपला हे त्यांच्या लक्षातही आले नाही.

स दुष्प्रापयशाः प्रापदाश्रमं श्रान्तवाहनः।
सायं संयमिनस्तस्य महर्षेर्महिषीसखः।।४८।।
वनान्तरादुपावृत्तैः समित्कुशफलाहरैः।
पूर्यमाणमदृश्याग्निप्रत्युद्यातैस्तपस्विभिः।।४९।।
आकीर्णमृषिपत्नीनामुटजद्वाररोधिभिः।
अपत्यैरिव नीवारभागधेयोचितैर्मृगैः।।५०।।
सेकान्ते मुनिकन्याभिसततक्षणोज्झितवृक्षकम्।
विश्वासाय विहङ्गानामालवालाम्बुपायिनाम्।।५१।।
आतपात्ययसंक्षिप्तनीवारासु निषादिभिः।
मृगैर्वर्तितरोमन्थमुटजाङ्गनभूमिषु।।५२।।
अभ्युत्थिताग्निपिशुनैरतिथीनाश्रमोन्मुखान्।
पुनानं पवनोद्धूतैर्धूमैराहुतिगन्धिभिः।।५३।।

अशा रीतीने इतरांना सहजासहजी न लाभणारे यश प्राप्त झालेला, प्रवासाने थकलेला तो राजा आपल्या पत्नीसमवेत संध्याकाळच्या सुमारास संयमी वसिष्ठाच्या आश्रमात येऊन पोहोचला.

समिधा दर्भ व कंदमुळे गोळा करून जंगलातून परत आलेल्या व अदृश्य अशा यज्ञीय स्वागत केलेल्या तपस्वी जनांनी भरलेल्या, ऋषिपत्नींच्या मुलांप्रमाणे असणाऱ्या व नीवार धान्यातील आपला भाग मिळविण्यास चटावल्यामुळे झोपड्यांची द्वारे अडवून धरणाऱ्या हरिणांनी तो आश्रम व्याप्त होतो. पाणी घालून झाल्यानंतर वृक्षांच्या बुंध्याभोवतालच्या आळ्यातील पाणी पिण्यास पक्ष्यांना भीती वाटू नये म्हणून तेथील ऋषिकन्या वृक्षांपासून दूर झाल्या होत्या. ऊन टळून गेल्यामुळे नीवार धान्याच्या राशी करून ठेवलेल्या आश्रमातील. अंगणात बसून हरिणांनी रवंथ चालू केला होता.

यज्ञीय अग्नी प्रज्वलित केला आहे असे दर्शविणाऱ्या हविर्द्रव्यांच्या गंधाने सुगंधित झालेल्या वायूमुळे चहूकडे परलेल्या धुराने आश्रमाकडे येणाऱ्या अतिथींना तो आश्रम पुनीत करत होता.

अथ यन्तारमादिश्य धुर्यान्विश्रामयेति सः।
तामवारोहयत्पत्नीं रथादवततार च।।५४।।

नंतर घोड्यांना विश्रांती देण्याची आज्ञा सारथ्याला करून त्या राजाने आपल्या धर्मपत्नीस रथातून उतरविले आणि आपण ही रथातून उतरला.

तस्मै सभ्याः सभार्याय गोप्त्रे गुप्ततमेन्द्रियाः।
अर्हणामर्हते चक्रुर्मुनयो नयचक्षुषे।।५५।।

शास्त्राने पालन करणाऱ्या, प्रजेचे संरक्षण करणाऱ्या प्रशंसनीय आणि पत्नीसह असलेल्या त्या राजाचे सभ्य व इंद्रिय निग्रह करणाऱ्या अशा तेथील मुनींनी स्वागत केले.

विधेः सायन्तनस्यान्ते स ददर्श तपोनिधिम्।
अन्वासितमरून्धत्या स्वाहयेव हविर्भुजम्।।५६।।

सायंकाळची नित्यकर्मे आटोपून तो राजा स्वाहाने युक्त असलेल्या अग्नीप्रमाणे अरुंधतीसह बसलेल्या वसिष्ठ मुनीच्या दर्शनास गेला.

तयोर्जगृहतुः पादान्राजा राज्ञी च मागधी।
तौ गुरुर्गुरुपत्नी च प्रीत्या प्रतिननन्दतुः।।५७।।

तेथे मगधराजपुत्री राणी सुदक्षिणा आणि राजा दिलीप यांनी अरुधती व वसिष्ठ मुनी यांना नमन केले. व मुनी पतिपत्नीने मोठ्या प्रेमाने त्यांना आशीर्वाद देऊन त्यांना अनंद दिला.

तमातिथ्यक्रियाशान्तरथक्षोभपरिश्रमम्।
पप्रच्छ कुशलं राज्ये राज्याश्रममुर्निं मुनिः।।५८।।

आदरसत्काराच्या योगे ज्यांच्या प्रवासाचा शीण नाहीसा झाला आहे अशा त्या राजमहालात राहून ही मुनीप्रमाणे आचरण करणाऱ्या राजाला वसिष्ठ मुनींनी राज्याचे कुशल विचारले.

अथाथर्वनिधेस्तस्य विजितारिपुरः पुरः।
अर्थ्यामर्थपतिर्वाचमाददे वदतां वरः।।५९।।

तेव्हा त्या ऐश्वर्यशाली, शत्रुंची नगरे जिंकणाऱ्या व उत्कृष्ट वक्ता असलेल्या राजाने अथर्ववेद पूर्ण जाणणाऱ्या त्या मुनीला अर्थपूर्ण अशा वाणीने म्हटले की,

उपपन्नं ननु शिवं सप्तस्वङ्गेषु यस्य मे।
दैवीनां मानुषीणां च प्रतिहर्ता त्वमापदाम्।।६०।।

हे गुरुवर! दैवी व मानुषी आपत्तींचे निराकरण करण्यास आपण समर्थ आहात. तेव्हा माझ्या राज्याच्या सातही अंगांचे कुशल असावे हे योग्यच आहे. (टीप. राज्याचे सात अंग पुढीलप्रमाणे आहेत. स्वामी, मंत्री, मित्र, कोष, राष्ट्र, दुर्ग व सैन्य.)

तव मन्त्रकृतो मन्त्रैर्दूरात्प्रशमितारिभिः।
प्रत्यादिश्यन्त इव मे दृष्टलक्ष्यभिदः शराः।।६१।।

आपण स्वतः मंत्रांची रचना करणारे आहात. त्या आपल्या मंत्रांनी दुरूनच चीत केल्यामुळे त्या मंत्रांनी केवळ डोळ्यांनी दिसणाऱ्या वस्तूंना भेदणाऱ्या माझ्या बाणांना मागे टाकलेले आहे. इति श्रीरघुवंशे महाकाव्ये कविश्रीकालिदासकृतौ रघुराज्याभिषेकः नाम पुथमः सर्वः।

हविरावर्जितं होतस्त्वया विधिवदग्निषु।
वृष्टिर्भवति सस्यानामवग्रहविशोषिणाम्।।६२।।

हे होत्या! आपण विधिपूर्वक अग्नीत टाकलेले हवीच अवर्षणामुळे करपून जाणाऱ्या पिकांवर वृष्टी करतात.

पुरुषायुष्यजीविन्यो निरातङ्कन निरीतयः।
यन्मदीयाः प्रजास्तस्य हेतुस्त्वद्ब्रह्मवर्चसम्।।६३।।

माझी प्रजा जी शतायु, निर्भय व आपत्ती रहित आहे त्यामागचे कारण देखील आपले ब्रह्मतेजच आहे.

त्वयैवं चिन्त्यमानस्य गुरुणा ब्रह्मयोनिना।
सानुबन्धाः कथं न स्युः संपदो मे निरापदः।।६४।।

साक्षात् ब्रह्मपुत्र असलेल्या आपल्यासारख्या गुरूनी अशाप्रकारे नेहमी आमची काळजी वाहिल्यावर संकटमुक्त असणाऱ्या माझ्यासारख्याची भरभराट का होणार नाही?

किन्तु वध्वां तवैतस्यामदृष्टसदृशप्रजम्।
न मामवति सद्वीपा रत्नसूरपि मेदिनी।।६५।।

तथापि आपल्या स्नुषेच्या पोटी (राणी सुदक्षिणेच्या पोटी) आत्मसदृश पुत्रप्राप्ती झालेली नसल्याने अनेक द्वीपांचा समावेश असणाऱ्या व अनेक रत्ने प्रसवणाऱ्या या पृथ्वीपासूनही मला आनंद प्राप्त होत नाही.

नूनं मत्तः परं वंश्याः पिण्डविच्छेददर्शिनः।
न प्रकामभुजः श्राद्धे स्वधासंग्रहतत्पराः।।६६।।

माझ्या पश्चात आपल्याला पिंडदान करणारे कोणी नाही हे पाहून अन्नाचा संग्रह करण्याच्या काळजीने माझे पितर श्राद्धसमयी पोटभर जेवत देखील नसतील असे वाटते.

मत्परं दुर्लभं मत्वा नूनमावर्जितं मया।
पयः पूर्वैः स्वनिः श्वासैः कवोष्णमुपभुज्यते।।६७।।

तसेच माझ्या पश्चात आपल्याला पाणी देणारे कोणी नाही या विचाराने मी दिलेले पाणी आपल्या निःश्वासानी कोमट करून ते सेवन करत असतील!

सोऽहमिज्याविशुद्धात्मा प्रजालोपनिमीलितः।
प्रकाशश्चाप्रकाशश्च लोकालोक इवाचलः।।६८।।

म्हणूनच यज्ञयागादिकांच्या योगाने माझे चित्त शुद्ध झालेले असले तरी संततीच्या अभावामुळे काळवंडलेला असल्यामुळे माझ्यावर देखील लोकालोक पर्वताप्रमाणे प्रकाश व काळोख दोन्ही आहेत, अर्थात आनंद व दुःख दोन्ही आहेत. (टीप. पूर्वी अशी कल्पना होती की पृथ्वी ही सपाट असून तिच्याभोवती लोकालोक नामक पर्वताची भिंत आहे व सूर्यचंद्रादि ग्रह या भिंतीच्या आतल्या बाजूस फिरत असतात. त्यामुळे लोकालोक पर्वतावर एका बाजूस प्रकाश व दुसऱ्या बाजूस अंधार असतो.)

लोकान्तरसुखं पुण्यं तपोदानसमुद्भवम्।
संततिः शुद्धवंश्या हि परत्रेह च शर्मणे।।६९।।

तप दानक्रिया इ. गोष्टींपासून उत्पन्न होणाऱ्या पुण्याचे फळ हे परलोकी सुखप्राप्ती होणे हे आहे पण सुशील संतती ही इहलोकी तथा परलोकीदेखील कल्याणकारी आहे.

तया हीनं विधातर्मां कथं पश्यन्न दूयसे।

सिक्तं स्वयमिव स्नेहाद्वन्ध्यमाश्रमवृक्षकम्।।७०।।

हे गुरुवर! आश्रमातील स्वतःप्रेमाने पाणी घालून वाढवलेला वृक्ष वारू निघावा त्याप्रमाणे मला संततिहीन पाहून आपल्याला वाईट कसे वाटत नाही?

असह्यपीडं भगवन्नृणमन्त्यमवेहि मे।

अरुन्तुदमिवालानमनिर्वाणस्य दन्तिनः।।७१।।

हे भगवन! जखडून ठेवलेल्या हत्तीला ज्याप्रमाणे साखळदंडांनी पीडा असह्य होते त्याप्रमाणे माझे हे पैतृक ऋण मला असह्य पीडा देत आहे.

तस्मान्मुच्ये यथा तात संविधातुं तथार्हसि।

इक्ष्वाकूणां दुरापेऽर्थे त्वदधीना हि सिद्धयः।।७२।।

म्हणून हे गुरुवर! मी या ऋणातून मुक्त हावे याकरिता काहीतरी घडवून आणावे. इक्ष्वाकू वंशातील राजांना असाध्य असलेल्या गोष्टींची सिद्धी सर्वस्वी आपल्या स्वाधीन आहे.

इति विज्ञापितो राज्ञा ध्यानस्तिमितलोचनः।

क्षणमात्रमृषिस्तस्थौ सुप्तमीन इव ह्रदः।।७३।।

अशा रीतीने राजाने प्रार्थना केल्यावर तो ऋषी मासे झोपी गेल्यामुळे प्रशांत भासणाऱ्या सरोवरा प्रमाणे क्षणमात्र किंचित डोळे मिटून ध्यानस्थ झाला.

सोऽपश्यत्प्रणिधानेन सन्ततेः स्तम्भकारणम्।

भावितात्मा भुवो भर्तुरथैनं प्रत्यबोधयत्।।७४।।

ध्यानस्थ स्थितीमुळे शुद्ध अंतःकरण झालेल्या त्या ऋषीला राजाच्या संततीप्रतिबंधाचे कारण दिसले व ते त्याने लगेच निवेदन केले.

पुरा शक्रमुपस्थाय तवोर्वीं प्रति यास्यतः।

आसीत्कल्पतरुच्छायामाश्रिता सुरभिः पथि।।७५।।

पूर्वी एकदा तू इंद्राला मदत करून भूतलावर परत यावयास निघाला होतास, तेव्हा तुझ्या वाटेत कल्पतरूच्या छायेत कामधेनु बसलेली होती.

धर्मलोपभयाद्राज्ञीमृतुस्नातामिमां स्मरन्।

प्रदक्षिणक्रियार्हायां तस्यां त्वं साधु नाचरः।।७६।।

आपली स्त्री ऋतुस्नात असल्याचे जाणून असल्यामुळे धर्म लोप होईल या भीतीने (त्याच विचारात गुंतल्यामुळे) प्रदक्षिणा घालण्यास योग्य अशा त्या धेनूला तू प्रदक्षिणा घातली नाहीस.

अवजानासि मां यस्मादतस्ते न भविष्यति।

मत्प्रसूतिमनाराध्य प्रजेति त्वां शशाप सा।।७७।।

तेव्हा ज्या कारणामुळे तू माझा अनादर केला आहेस त्याअर्थी माझा संततीची सेवा केल्याशिवाय तुला संततीची प्राप्ती होणार नाही असा शाप तिने तुला दिला.

स शापो न त्वया राजन्न च सारथिना श्रुतः।

नदत्याकाशगङ्गायाः स्रोतस्युद्दामदिग्गजे।।७८।।

उद्दाम झालेल्या दिग्गजांच्या चीत्कारांनी आकाशगंगेचा प्रवाह खळखळत आसल्यामुळे तो शाप तुला अथवा तुझ्या सारथ्याला ऐकू आला नाही.

ईप्सितं तदवज्ञानाद्विद्धि सार्गलमात्मनः।

प्रतिबध्नाति हि श्रेयः पूज्यपूजाव्यतिक्रमः।।७९।।

तिच्या या शापाच्या प्रभावामुळेच मुझे मनोरथ पूर्ण होण्यास विलंब होतो आहे; समजलास? कारण पूजनीयांच्या पूजेत भंग झाला असता कल्याणाला प्रतिबंध होतो.

हविषे दीर्घसत्रस्य सा चेदानीं प्रचेतसः।
भुजङ्गपिहितद्वारं पातालमधितिष्ठति।।८०।।

ती (कामधेनू) सध्या वरुणाच्या दीर्घ सत्रात हवी मिळावेत यासाठी दरवाजांवर भुजंग असलेल्या पाताळात आहे. (टीप. सत्र म्हणजे दीर्घकाळ चालणारा यज्ञ)

सुतां तदीयां सुरभेः कृत्वा प्रतिनिधिं शुचिः।
आराधय सपत्नीकः प्रीता कामदुघा हि सा।।८१।।

म्हणून त्या कामधेनूच्या कालवडीला कामधेनूची प्रतिनिधी मानून तू भार्येसह शुद्ध अतःकरणाने तिची आराधना कर. ती प्रसन्न झाली की मनोरथ पूर्ण होतील.

इति वादिन एवास्य होतुराहुतिसाधनम्।
अनिन्द्या नन्दिनी नाम धेनुराववृते वनात्।।८२।।

अशा रीतीने ते हवनशील मुनी बोलत असतानाच त्यांच्या आहुतीचे साधन असलेली ती नंदिनी नामक पूज्य कामधेनू वनातून परत आली.

ललाटोदयमाभुग्नं पल्लवस्निग्धपाटला।
बिभ्रती श्वेतरोमाङ्कं सन्ध्येव शशिनं नवम्।।८३।।

कोवळ्या पालवीप्रमाणे लालसर तांबूस व तुळतुळीत अंगकांती असणाऱ्या तिच्या कपाळावर पांढऱ्या केसांची किंचित वाकडी अशी कोर होती. त्यामुळे ती जणू द्वितीयेचा चंद्र धारण करणाऱ्या संध्ये प्रमाणे दिसत होती.

भुवं कोष्णेन कुण्डोध्नी मेध्येनावभृथादपि।
प्रस्रवेनाभिवर्षन्ती वत्सालोकप्रवर्तिना।।८४।।

आपल्या वासराला पाहून पान्हा फुटल्याने ती आपल्या मोठमोठ्या आंचळातून स्रवणाऱ्या यज्ञातील अवभृथ स्नानापेक्षा पवित्र असलेल्या धारोष्ण दुग्ध धारेने जमिनीचे सिंचन करीत होती.

रजःकणैः खुरोद्धूतैः स्पृशद्भिर्गात्रमन्तिकात्।
तीर्थाभिषेकजां शुद्धिमादधाना महीक्षितः।।८५।।

आपल्या खुरांनी उडालेल्या धूलिकणांचा स्पर्श राजाला करवून ती त्याला तीर्थयात्रेद्वारे प्राप्त होणारी शुद्धी प्रदान करीत होती.

तां पुण्यदर्शनां दृष्ट्वा निमित्तज्ञस्तपोनिधिः।
याज्यमाशंसितावन्ध्यप्रार्थनं पुनरब्रवीत्।।८६।।

शुभाशुभ योग जाणणारे तपोनिधी वसिष्ठ मुनी या पुण्यदर्शन अशा धेनूला पाहताच ज्याचे मनोरथ निष्फळ व्हायचे नाही अशा त्या यज्ञ करण्यास योग्य अशा राजाला पुन्हा म्हणाले,

अदूरवर्तिनीं सिद्धिं राजन् विगणयात्मनः।
उपस्थितेयं कल्याणी नाम्नि कीर्तित एव यत्।।८७।।

हे राजा ज्या अर्थी नाव घेताच ही पुण्यकर धेनू येथे उपस्थित झाली आहे त्याअर्थी तुझे मनोरथ लवकरच पूर्ण होणार आहेत म्हणून समज.

वन्यवृत्तिरिमां शश्वदात्मानुगमनेन गाम्।
विद्यामभ्यसनेनेव प्रसादयितुमर्हसि।।८८।।

वन्य वृत्ती धारण करून ज्याप्रमाणे सतत अभ्यासाने विद्या प्राप्त करून घ्यावी त्याप्रमाणे सतत तिच्या मागोमाग राहून तिला प्रसन्न करून घे.

प्रस्थितायां प्रतिष्ठेथाः स्थितायां स्थितिमाचरेः।
निषण्णायां निषीदास्यां पीताम्भसि पिबेरपः।।८९।।

ती चालू लागली की तू चाल, ती उभी राहिली असता तू उभा रहा. ती बसली असता तु बस व ती पाणी प्यायल्या नंतरच तू पाणी पी.

वधूर्भक्तिमती चैनामर्चितामा तपोवनात्।
प्रयता प्रातरन्वेतु सायं प्रत्युद्व्रजेदपि।।९०।।

तुझ्या भार्येनेदेखील इंद्रिय निग्रह करून भक्तियुक्त अंतःकरणाने या धेनूची पूजा करून प्रातःकाली तपोवनाच्या वेशीपर्यंत तिला पोहोचवण्यास व सायंकाळी घेण्यास जावे.

इत्याप्रसादादस्यास्त्वं परिचर्यापरो भव।
अविन्घमस्तु ते स्थेयाः पितेव धुरि पुत्रिणाम्।।९१।।

अशा प्रकारे तू तिची कृपा होईपर्यंत सेवा करावीस. तुझ्या मार्गात विघ्न न येवो. पुत्रवंतांच्या मालिकेत तुला प्रभावी अग्रभागी स्थान मिळो.

तथेति प्रतिजग्राह प्रीतिमान्सपरिग्रहः।
आदेशं देशकालज्ञः शिष्यः शासितुरानतः।।९२।।

काळ, वेळ जाणणाऱ्यात्या वशिष्ठशिष्य राजाने आपल्या पत्नीसह आनंदित होत नम्रपणाने गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानली.

अथ प्रदोषे दोषज्ञः संवेशाय विशांपतिम्।
सूनुः सूनृतवाक्स्रष्टुर्विससर्जोर्जितश्रियम्।।९३।।

नंतर रात्री त्या विद्वान व मधुर भाषी ब्रह्मपुत्र वसिष्ठाने ऐश्वर्यवान अशा भूपतीला रात्री निजावयास जाण्याची आज्ञा दिली.

सत्यामपि तपः सिद्धौ नियमापेक्षया मुनिः।
कल्पवित्कल्पयामास वन्यामेवास्य संविधाम्।।९४।।

तपः सामर्थ्याने सर्व साधनसामग्री मिळवण्याचे सामर्थ्य असूनही, राजाने व्रताचे पालन करावे म्हणून, त्या व्रतानुष्ठान जाणणाऱ्या मुनीने त्याच्याकरिता आश्रमयोग्य अशाच सोयींची व्यवस्था केली.

निर्दिष्टां कुलपतिना स पर्णशाला –
मध्यास्य प्रयतपरिग्रहद्वितीयः।
तच्छिष्याध्ययननिवेदितावसानां
संविष्टः कुशशयने निशां निनाय।।९५।।

इति श्रीरघुवंशे महाकाव्ये कविश्रीकालिदासकृतौ वसिष्ठाश्रमाभिगमनम् नाम प्रथमः सर्गः।

अशा प्रकारे त्या राजाने कुलपती गुरु वसिष्ठांनी दाखवून दिलेल्या पर्णशाळेत आपल्या व्रतस्थ पत्नीसोबत दर्भशय्येवर निजून वसिष्ठ शिष्यांच्या वेदपठणाने जिची समाप्ती सुचविली आहे, अशी रात्र घालविली.

याप्रमाणे श्री कालिदास कवीने रचलेल्या श्री रघुवंश नामक महाकाव्यातील वसिष्ठाश्रमाभिगमन नामक प्रथम सर्ग समाप्त झाला.

१.५ कालिदासाने स्वतःच्या अल्पमतीचे वर्णन कसे केले आहे?

कालिदासाने रघुवंशाचे वर्णन करतांना आपल्या अल्प मतिची चिकित्सा केली आहे. खरे बघता त्याचे रघूवंशम् हे काव्य ''काव्यं यशसे अथकृते व्यवहारी विदे शिवेतरक्षतये'' सद्यः परनिर्वृत्तये कान्तासंमिततयोपदेशयुजे।। ही सर्व काव्याची विशेषणे 'रघूवंशम्' या महाकाव्याला लागू पडतात.

कालिदासाने मात्र स्वत:कडे खूपच अल्पमतित्व घेतले आहे. प्रथमत: कालिदास जगाचे नियंते असणाऱ्या पार्वती – परमेश्वर यांना वंदन करतो.

वागर्थाविव संप्रृक्तौ वागर्थप्रतिपत्तये।
जगत: पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ।।

शब्द व अर्थ यांच्याप्रमाणे नित्यसंबंधित किंवा निगडीत असलेल्या जगाच्या आई बापांना जनक जननी असलेल्या पार्वती, परमेश्वर यांना, त्या शब्द आणि अर्थाचे सम्यक ज्ञान व्हावे म्हणून मी प्रणाम करतो.

रघूवंश हा सूर्यवंश आहे. सूर्यासारख्या महान तेजस्वी वंशाचे वर्णन करणे म्हणजे कालीदासाला मूर्खपणाच वाटतो. तो म्हणतो

क्वसूर्यप्रभवो वंश: क्वचाल्पविषया मति:।
तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम्।।

रघूवंशाचे वर्णन करणे म्हणजे माझ्यासारख्या अल्पमति असणाऱ्या माणसाने दूस्तर असा महासागर छोटयाशा (उडपाने) होडीने तरुन जाण्याची इच्छा करण्यासारखे आहे. ३) स्वत:ला कालिदास इतका अल्पमति आणि मूर्ख समजतो की त्याला रघूवंशाचे वर्णन करणे म्हणजे उंच माणसाच्या हाती सहज लागणारी फळे मिळवण्याकरता वेगळया माणसाने हात वर करुन फळे मिळवण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. त्यांच्या उपहासाला कारणीभूत होण्यासारखे आहे.

कालिदास पूढे असेही म्हणतो,

अथवा कृतवाग्द्वारे वंशेऽस्मिन्पूर्वसूरिभि:।
मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गति:।।

अर्थात् प्राचीन कवींनी आपल्या वाणीवैभवाने यामध्ये प्रवेश करुन ठेवलेलाच आहे. वज्राने समुत्कीर्ण केलेल्या छिद्रे पाडलेल्या मण्यांमध्ये दोरा जसा सहज जातो तसा मलाही तेथे सहज मार्ग काढता येईल.

अश्याप्रकारे पूर्वसूरींचा गुणनिर्देश कालिदासाने या श्लोकाद्वारे केलेला आहे. आता पुढच्या श्लोकापासून कालिदास रघूवंशाचे वर्णन करण्यास सिद्ध झाला आहे.

१.६ प्र. रघुवंशाचे वर्णन करा

रघुवंश हे पंचमहाकाव्यापैकी एक आहे. हे रामायणावरुन रचले आहे. परंतु रामायणात न आढळणारी दिलीप, रघू वगैरे राजांची यात हकीगत आहे. रघुकुलाविषयी माहितीने याचा प्रारंभ झाल्याने त्याला रघुवंश असे म्हणतात. रघुवंशातील राजांच्या अंगी कोण कोणते गुण होते आणि ते किती उत्कृष्ट राज्यकारभार करीत असत याचे वर्णन कालिदासाने केलेले आहे. 'उपमा कालिदासस्य' या वचनाप्रमाणे या रघुकुलाच्या वर्णनामध्ये उपमा अलंकाराचा खूप वापर केलेला दिसून येतो.

कालिदास म्हणतो, मी अल्पमती असूनही आणि रघुवंशाचे वर्णन करणे महादूष्कर कर्म असूनही त्यात प्रवेश करण्याचे मी ठरवले आहे. रघूवंशातील राजे अतिशय उद्यमी होते. जन्मापासूनच शुद्ध असणारे, कर्माचे फळ मिळेपर्यंत प्रयत्न करणारे, समुद्रातीरापर्यंत राज्यविस्तार असणारे, स्वर्गापर्यंत रथाची गती असणारे, यथाविधी यज्ञयाग करणारे, अश्या त्या राजांचे वर्णन मी करतो. रघुकुलातील राजे आपले आयुष्य कसे घालवित असत हे सांगताना कालिदास म्हणतो,

शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम्।
वार्द्धके मुनिवृत्तींना योगेनान्ते तनुत्यजाम्।।

बालपणी विद्याभ्यास, तारुण्यात विलासांचा उपभोग, वृद्धापकाळी वानप्रस्थाश्रम व शेवटी परमात्म्याचे चिंतन करीत रघुवंशातील राजे देहत्याग करीत असत. रघुवंशातील राजे यथाविधी यज्ञयागही करत असत. अपराध्याला

दंड दिला जात असे. रघुवंशातील राजांना कालिदासाने **सत्याय मितभाषिणाम्, यशसे विजिगुषुणाम्, अनाकरयवर्त्मनाम्, आफलोदय कर्मणाम्, त्यागाय संभृतार्थानाम्** इत्यादी सुयोग्य विशेषणे वापरली आहेत. अशा राजांचे म्हणजेच पर्यायाने रघुवंशाचे वर्णन कालिदास करतो.

स्वत:विषयी नम्रपणा बाळगुन कालिदास म्हणतो,

रघूणामन्वयं वक्ष्ये तनुवाग्विभवोऽपि सन्।
तग्द्रुणै: कर्णमागत्य चापलाय प्रचोदित:।।

अशाप्रकारे रघुवंशाचे वर्णन करायला कालिदास सिद्ध झालाय. रघुवंशाचे वर्णन वाचणाऱ्या विद्वानांना सुद्धा त्याने सदसव्दयक्तिहे तव: असे विशेषण लावले आहे. म्हणजे रघुवंशासारख्या श्रेष्ठ कुलाचे वर्णन ऐकणारा श्रोता सुद्धा चांगल्या – वाईटाची निवड करण्या इतपत पात्र असेल ताने ऐकावे अशी कालिदास इच्छा करतो. यासाठी त्याने **हेम्न: संलक्ष्यते हयग्नौ विशुध्दि: श्यामिकापि वा।।**

अस सूरेख दृष्टांत दिला आहे.

१.७ प्र. दिलीपराजा वसिष्ठाश्रमात जात असतांच्या मार्गाचे वर्णन करा.

कालिदासाची प्रतिभा त्याच्या सृष्टी वर्णनातही दिसून येते. रघुवंशामध्ये दिलीप पुत्रप्राप्तीच्या आशेने वसिष्ठमुनींच्या आश्रमामध्ये जाण्यासाठी निघाला. त्याच्याबरोबर त्याची मगधकुलांत उत्पन्न झालेली सुदक्षिणा नावाची पत्नी होती. राजवाडया पासून वसिष्ठाश्रमाच्या मार्गाचे सूंदर वर्णन कालिदास करतो. तो रथ पावसाळ्यातील मेघावर विदयूत आणि ऐरावत असावे त्याप्रमाणे मधूर व गंभीर आवाज करणारा होता. दिलीपाचा तेजोविशेष इतका उठून दिसणारा होता, की मोजका परिवार बरोबर घेतला असला तरी सैन्याच्या आणि राजाच्या तेजामुळे मधूर सैन्य घेवून राजा चाललाय असे वाटत होते.

मार्गात असणाऱ्या वृक्षराजीचे सूंदर वर्णन कालिदासाने केले आहे. तो म्हणतो,

सेव्यमानौ सुखस्पर्शै: शालनिर्यासुगन्धिभि:।
पूष्परेवूस्किरैवर्तिराधुत वनराजिभि:।।३८।।

आश्रमापर्यंतचा मार्ग सूगन्धि वातावरणाने भारलेला होता. रथाच्या खडबडाटाने शिखण्डि म्हणजे मोर, षडज् स्वरामध्ये मधूर केकारव करत होते. वाटेमध्ये हरणांची जोडपीसूध्दा रथाकडे टक लावून बघतांना दिसत होती. आकाशामध्ये उडणारे सारस रांगेने उडत असल्याने आधाररहीत तोरणाप्रमाणे दिसत होते. त्यांचा मधूर आणि अस्पष्ट आवाज दिलीप राजा, सूदक्षिणा राणी किंचीत मानवर करुन ऐकत होती.

मनोरथसिद्धीसुचक पवन (वारा) वहात असल्यामुळे दोघांचीही शिरोभूषणे व केशकलाप घोडयांच्या खूरानी उधळलेल्या धूरळयामुळे मुळीच मळली नव्हती. लाटांच्या तरंगामुळे सरोवरातील कमलांचा सुवास सूद्धा शीतल झालेला होता. अशा आनंदीत वातावरणात दोघांचा रथ जात होता. मार्गामध्ये यज्ञ करणाऱ्यांकडून सार्थ होणारे आशिर्वाद त्यांना मिळत होते. मार्गामध्ये ताजे तुप, लोणी घेऊन आलेल्या वृद्ध घोषाला (गवळयांना) वनान्याम् मार्गशाखिनाम् नामधेयानि पृच्छन्तौ: (मार्गामध्ये रानटी रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडांची नावे विचारीत दोघे जात होते.)

दोघांचेही कपडे झगझगीत होते. त्यामुळे दोघेही हिमनिर्मुक्तयोर्योगे चित्राचन्द्रसोरिव (हिमकाळातून मुक्त झालेल्या म्हणजे शिशिर ऋतुतील चित्रानक्षत्र आणि चन्द्र यांच्या या दोघांप्रमाणे अतिशय शोभायमान दिसत होती.)

प्रियदर्शन आणि बुधोपम भुमिपती दिलीप सूदक्षिणेला मार्गात निरनिराळया गोष्टी दाखवितांना त्यांना मार्ग कधी संपला हे समजलेच नाही.

अशाप्रकारे ते दोघेही आश्रमापर्यन्त आले. या मार्ग वर्णनातही चित्रा नक्षत्र व चन्द्र यांचा संयोग, मयूरांच्या गोड केका सारसा पक्ष्यांच्या रांगेत शिस्तबध्द उण्यांचे सूंदर वर्णन, मृगयूगुलावर केलेला श्लेष वगैरेचे सूंदर वर्णन आलेले आहे. खरोखरच **'उपमा कालिदासस्य'** हे वचन त्याच्या निसर्गवर्णनात व मार्गवर्णनात ही लागु पडले.

१.८ वसिष्ठाश्रमाचे वर्णन

कालिदासाने रघूवंश हे महाकाव्य रचिले. त्यातील पहिल्या सर्गात रघूचा पिता दिलीप याचे वर्णन आहे. त्याला संतती होत नव्हती म्हणून त्याने आपली पत्नी मगधकन्या सुदक्षिणा हिच्या बरोबर गुरु वसिष्ठांच्या आश्रमात जाण्याचे ठरविले. आश्रमात पोचला म्हणून या सर्गाचे नाव 'वसिष्ठाश्रमाभिगमन' असेच आहे. वसिष्ठांच्या आश्रमाचे वर्णनाही कालिदासाचे फारच सूंदर केले आहे.

प्रवासाने श्रान्त झालेले दोघेजण वसिष्ठांच्या आश्रमाशी पोचले ती वेळ संध्याकाळची होती. दोघांचेही वनातून समिधा, दर्भ, कंदमुहे आणणाऱ्या आणि अदृश्ययझिय अग्नीने ज्यांचे स्वागत केले आहे अश्या तपस्विनी राजाचे स्वागत केले. आश्रमातील कुप्यांची द्वारे निवारधान्यातील आपला भाग मिळवण्यासाठी चढावलेल्या हरणांनी अडवली होती. ऋषिपत्नींना ही हरणे अपत्यांप्रमाणे होती. ऋषिकन्यांचे वर्णनही कालिदासाने फार सुरेख केले आहे.

सेकान्ते मुनिकन्याभिस्तत्क्षणोज्झित वृक्षकम्।
विश्वासाय विहगांनामालवालम्बुपायिनाम्।।५१।।

मुनिकन्यासूद्धा आश्रमातील पशुपक्ष्यांवर जीव लावित असत वृक्षांना पाणी घालुन झाल्यावर बुंध्या भोवतालच्या अळयातील पाणीपिण्यासाठी पक्षी येत असत. त्यांना पाणी पिण्यास भिती वाटू नये म्हणून त्या वृक्षापासून दूर उभ्या होत्या. अंगणामध्ये निवार धान्यांच्या राशी केलेल्या होत्या. अंगणामध्ये हरणे नि:शंक पणे बसुन रवंथ करीत होती. आश्रमाचे वातावरण अतिशय पवित्र आणि सूगंधित झाले होते हे सांगणारा श्लोक तर फारच अप्रतिम आहे.

अभ्युत्थिताग्निपिशुनैरतिथीनाश्रमोन्मुखान्।
पुनानं पवनोद्धूतैर्धूमैराहुतिगन्धिभि:।।५३।।

आश्रमाकडे येणाऱ्या अतिथींना सुद्धा (सुदक्षिणा आणि दिलीप राजाला) आश्रमाचे वातावरण पुनित करत होते. इंद्रियनिग्रह करणाऱ्या सभ्य अशा त्या आश्रमातल्या मुनिनी आपल्या आवडत्या, प्रजेचे संरक्षण करणाऱ्या अशा राजाची पूजा केली. राजाने संध्याकाळचे विधी करुन गुरु वसिष्ठ व गुरुपत्नी अरुंधती यांचे दर्शन घेतले.

१.९ दिलीपराजाचे वर्णन व त्याचा राज्यकारभार

रघुवंश हे पंचमाहाकाव्यातील एक आहे. रघूचे वडील दिलीप या राजाविषयी सुद्धा कालिदासाने बरीच माहिती दिलेली आहे. 'वसिष्ठाश्रमाभिगमन' या रघूवंशाच्या पहिल्या सर्गामध्ये दिलीपराजाचे वर्णन आलेले आहे. दिलीप हा वैवस्वस मनुच्या कुलातील राजा होय त्याचे वर्णन करतांना कालिदास म्हणतो की मनु म्हणजे 'प्रणवश्छन्द सामिव' असा होता. वेदांतील ओंकाराप्रमाणे असणाऱ्या या शुद्धीमति वंशामध्ये दिलीप नावाचा राजा जन्मला.

तदन्वये शुद्धिमति: प्रसूत: शुद्धिमत्तर: ।
दिलीप इति राजेन्दुरिन्दु: क्षीर निधाविण।।

क्षीर समुद्रातल्या चंद्राची सुरेख उपमा दिलीपासाठी कालिदासाने दिलेली आहे. त्याच्या शरीर यष्टीचेही सूंदर वर्णन कालिदास करतो.

व्यूढोरस्को वषस्कन्ध: शालप्रांशुर्महाभुज:।
आत्मकर्मक्षमं देहे क्षात्रो धर्म इवाश्रित:।।

असा हा रुंद छातीचा, बैलासारखा असणारा राजा बलाने सूद्धा सर्वांहून अधिक होता. सर्वांना दिपवून टाकणारे तेज त्याच्या जवळ होते. मेरु पर्वताप्रमाणे आपल्या उंच व धिप्पाड शरीराने दिलीप राजा पृथ्वीला व्यापून राहीला होता. त्याची शरीरयष्टी आणि बुद्धी एकमेकाला साजेशी होती त्याचे वर्णन करतांना कालिदास म्हणतो. 'आकारसदृश प्रज्ञ:' प्रज्ञेला अनुरुप असा विदयाव्यासंग विदयाव्यासंगाप्रमाणेच व्यवसाय आणि व्यवसायनुरुप फलनिष्पत्ती त्याला प्राप्त होती. प्रजेला दिलीप राजाविषयी वाटणाऱ्या दराऱ्याचे, आदराचे वर्णन करतांना कालिदासाने थेट समुद्राची उपमा त्याला दिली आहे. तो म्हणतो,

भीमकान्तैर्नपगुणै: स वभूवोजीविनाम्।
अधृष्यश्चभिगम्यश्च यादोरत्नैरिवार्णव:।।

राजाची प्रजा त्याच्या कुशल राज्य कारभारात प्रसन्न व समाधानी होती. कालिदास म्हणतो कुशल सारथ्याच्या सारथ्यामुळे रथाची चाके चाकोरी सोडून जात नाहीत, त्याप्रमाणे दिलीप राजाची प्रजा मनुपासून चालत आलेल्या मार्गापासून '**रेखामात्रमपि**' (काडीभर सूद्धा)ढळत नसे. दिलीप राजा प्रजेच्या कल्याण करता प्रजेकडून कारभार घेत असे. हे सांगतांना कालीदासाने 'जगत्नियंत्या' सूर्याचे उदाहरण दिले आहे. सूर्य पृथ्वीवरील रस शोधून घेतो पण पर्जन्यरुपाने हजारो पटीने पृथ्वीला देत ही असतो.

दिलीप राजा अतिशय पराक्रमी तसेच बुद्धीमानही होता. त्याच सैन्य हे केवळ त्याचे राजचिन्ह होते. कार्य यशस्वी करण्यासाठी 'शास्त्रेषु अवकुंठीता बुद्धी' आणि प्रत्यंचा चढवलेले धनुष्य हेच त्याचे दोन मार्ग होते. राजकारणामध्ये त्याचे विचार व विकार गुप्त असत (संवृत्तमंन्त्रस्य आणि गुणाकारेग्डीतस्य) त्याच्या कार्याचे अनुमान करणे भल्याभल्यांना सूद्धा कठीण जात असे.

राज्यकारभार

दिलीप राजाच्या शरीरयष्टी बरोबरच त्याच्या राजा म्हणून असणाऱ्या गुणांचे व राज्यकारभाराचे वर्णन कालिदासाने केले आहे. राजकारणप्रसंगी त्याचे विचार व विकार गुप्त असायचे. आत्मरक्षण, धर्मरक्षण, द्रव्यसंपादन आणि आसक्ती रहीत सुखोपभोग दिलीपराजा घेत असे, म्हणजेच धर्म, अर्थ, काम या तिन्ही पुरुषार्थांचे आचरण करीत असतांना मोठा ह्या ४ थ्या पुरुषार्थाकडे ही त्याची वाटचाल होत होती. परस्परविरोधी गुण दिलीपाच्या ठिकाणी जूळया भावंडांप्रमाणे रहात असत हे सांगतांना कालिदास म्हणतो.

ज्ञाने मौनं क्षमा शक्तौ त्यागे श्लाघाविपर्याय:।
गुणा गुणानुबन्धित्वातस्य सप्रसवा इव ।।२२।।

त्याच्या विषयी आदाराने कालिदासाने त्याला वृद्ध असे म्हटले आहे. काम विषयांच्या ताब्यात दिलीपराजा गेलेला नव्हता. तो विद्या पारंगत होता. धर्मात रत होता. त्यामुळे तो वयोवृद्ध नव्हता पण ज्ञानवृद्ध होता कारण वैराग्य, ज्ञान व शील हे तिन्ही गुण त्याच्या जवळ होते.

प्रजेचे तो इतके उत्तम तऱ्हेने पालन करत असे की प्रजेसाठी आईवडील फक्त जन्म देणारे होते. कालिदास म्हणतो,

प्रजानां विनयाधानाद्रक्षणाभ्दरणादपि।
सपिता पितरस्तासां केवलं जन्महेतव:।।२४।।

दिलीप राजा राज्य कारभारही अत्यंत व्यवस्थित रित्या करत असे. समाज धारणे करता अपराध्यांना दंडही दिल्या जाई. संततिसाठी विवाह करीत असे त्यामुळे अर्थ आणि काम हे पुरुषार्थच साक्षात धर्म होते. कालिदासाने दिलीपाची देवांचा राजा इंद्राशी खूप सूरेख शब्दात तुलना केली आहे. दोघेही आपापल्या संपत्तीची देवाणघेवाण करुन भूवन द्वयाचे (पृथ्वी व स्वर्गाचे) पोषण करत असत. यज्ञाला इंद्रमहोत्सव असेही म्हणतात. इंद्राला संतुष्ट करण्यासाठीच यज्ञ करुन त्याला लर्विभागाचा श्रेष्ठ मान दिला जातो. मेघवाट असणारा इंद्र यज्ञाने संतुष्ट होऊन पर्जन्य पाडतो. या कल्पनेचा आधार घेतलेला हा श्लोक कालिदासाचे वर्णन सौंदर्य व व्यासंग दाखवितो. तो म्हणतो,

दुदोह गां स यज्ञाय सस्याय मघवा दिवम्।
संपव्दिनियमयेनोभौ दधतुर्भुवनद्वयम्।।२६।।

प्रजेचे रक्षण करणाऱ्या दिलीप राजाचे अनुकरण दुसऱ्या कोणालाही करता येत नसे कालिदास म्हणतो.

व्यावृत यत्परस्वेभ्य: श्रुतौ तस्करता स्थिता।।

'चोरी' हा शब्द दिलीपाच्या प्रजेला ऐकूनच माहिती होता. दिलीपाचे गुणवर्णन करतांना कालिदासाने त्याच्या सूंदर गुणांचे वर्णन केले आहे. रोग्याला औषधाचा तिटकारा असला तरी तो ते घेतो. तसेच एखादा मोठा आदरणीय

मनुष्य (शीष्ट) शत्रू असला तरी तो राजाला मान्य असे पण दुष्ट मनुष्याला मात्र सर्पदंश झालेल्या अंगुली प्रमाणे राजा दूर ठेवीत असे.

राजाच्या ठिकाणी सर्वगुण संपन्नता होती. सत्त्व, रज, तम या पंच महाभुत गुणांपैकी सत्त्व गुणच एकत्र करुन परोपकारी सज्जन अश्या दिलीपाची ब्रम्हदेवाने निर्मिती केली होती. तो म्हणतो.

तं वेधा विदधे नूनं महाभूतसमाधिना।
तथाहि सर्वे तस्यासन्परार्थैकफला गुणाः।।२९।।

पृथ्वी हीच जणू एक नगरी आहे व त्यावर एक छत्री असा दिलीप राजाचा अंमल चालत असे. समुद्ररुप खंदकाने समुद्रकिनाऱ्यारुपी तवनी वेढल्या गेलेल्या अखंड प्रृथ्वीवर दिलीपराज्य करत असे. मगध कुळातली, स्वभावदाक्षिण्यामुळे प्रसिद्ध असलेली सुदक्षिणा नावाची दिलीपाची पत्नी होती. तिच्यामुळेच व राजलक्ष्मी मुळेच तो स्वत:ला भार्यावन्त समजत असे. ह्या सूंदर आणि सुकुमार राणीच्या पोटी आत्मजन्म-समुत्सुक (पुत्रोत्सुक) असा राजा आनंदाने बराच काळ घालविता झाला. पण त्याची पूत्रजन्माची इच्छा मात्र पूर्ण न झाल्याने संतान प्राप्तीसाठी काही अनुष्ठान करावे म्हणून गुरु वसिष्ठांच्या आश्रमात जायला निघाला. पण प्रथम त्याने राज्याची धूरा प्रधानावर सोपविली.

दिलीप राजाचे, त्याच्या राज्यकारभार पध्दतीने आणि पुरुषार्थाचे पालन करणाऱ्या दिलीपाच्या राजा म्हणून असणाऱ्या आचरणाचे वर्णन कालिदासाने अप्रतिम केले आहे.

गुरुंचा आदर

उपपन्नं ननु शिवं सप्तस्वङ्गेषू यस्य मे।
दैवीना मानुषीणां च प्रतिहर्ता त्वमापदाम्।।६०।।
तव मन्त्रकृतो मन्त्रैर्दुरात्त्रशमितारिभिः।
प्रत्यादिश्यन्त इव मे दृष्टलक्ष्यमिदः शराः।।६१।।

कालिदास कृतं रघूवंशातील हे दोन श्लोक आहे. संतान प्राप्तीची इच्छा करणारा दिलीप राजा आपल्या पत्नी सूदक्षिणा हीच्या सह सायंकाळच्या सूमारास गुरु वसिष्ठ आणि गुरुपत्नी अरुंधती यांना भेटला व त्यांचे आशिर्वाद घेतले.

वसिष्ठ मुनीने त्यांना आशिर्वाद दिला आणि राज्याचे कुशल विचारले संपत्तीमान, शत्रूला जिंकणाऱ्या आणि उत्कृष्ट वक्ता असणाऱ्या दिलीप राजाने अथर्ववेद जाणणाऱ्या, गुरुला अर्थ पूर्ण भाषेतच उत्तर दिले. राजा म्हणतो, हे गुरो! दैवी किंवा मानुवी संकटांचे निवारण करण्यास आपण समर्थ आहात आणि म्हणूनच माझ्या राज्याच्या सातही अंगांचे कुशल आहे. (सत्पष्वकोश) येथे राज्याच्या १) स्वामी २) अमात्य ३) सुहृद ४) कोश ५) राष्ट्र ६) दुर्ग ७) बल ह्या सात अंगांचा संदर्भ आलेला आहे. राजगुरु हा (वसिष्ठांसारखा) राज्यावर पूर्ण नजर ठेवणारा असे हे ही समजून येते.

राजा पूढे वसिष्ठांना म्हणतो, तुम्ही मन्त्र करणारे आहात त्यामुळे आपल्या मन्त्रांनी दुरुनच शत्रूंचा पाडाव केलेला आहे. माझे हे फक्त डोळयानी दिसणाऱ्या वस्तुंनाच, भेद करणारे असल्याने मागेच पडले आहेत. वसिष्ठ हे मन्त्रकृतऋषी होते. म्हणजे वेदातील मन्त्रांची रचना त्यांनी केलेली होती हेही समजते.

या दोन श्लोकांवरुन तत्कालीन राजगुरु सूद्धा अथर्ववेद जाणणारे, मन्त्रांची रचना करणारे आणि राजावर पूर्ण हुकमत असणारे असायचे.

पुरुषायुष्यजीविन्यो निरातङ्का निरीतयः।
यन्मदीयाः प्रजास्तस्य हेतुस्त्वद्ब्रह्मवर्चसम्।।६३।।

माझी प्रजा शतायु निर्भय आपत्तिरहीत आहे त्याला तरी कारण आपले ब्रम्हतेजच।

१.१० राजाने स्वत:चे संततिहीन असल्याचे दु:ख कसे व्यक्त केले आहे?

किंतु वध्वां तवैतस्यामदृष्टसदृषप्रजम्।
न मामवति सद्वीपा रत्नसूरपि मेदिनी।।६५।।

हा श्लोक कालिदासकृत रघूवंशामध्ये पहील्या सर्गात आलेला आहे.

राज्याची धूरा सचिवावर सोपवून राजा दिलीप व त्याची पत्नी सुदक्षिणा दोघेही संन्तान प्राप्ती साठी काही अनुष्ठान करावे म्हणून गुरु वसिष्ठांच्या आश्रमात पोचली. गुरु वसिष्ठ हे राजगुरु होते मन्त्रकृत् ऋषी होते राज्याच्या सप्ताहाचे कुशल जाणून त्याची व्यवस्था करणे हे ही त्यांचेच कर्तव्य होते. दिलीप राजाने अर्थपूर्ण शद्वात गुरु वसिष्ठांचा आदर केला. सन्माननीय शद्व वापरुन गुरुंच्या ब्रम्हतेजानेच माझी प्रजा शतायू निर्भय व आपत्ती रहीत आहे असे गौरवाने सांगितले. सर्व कुशलाची देवाण घेवाण झाल्यावर पूत्र नसल्याची खंत राजाने या श्लोकात व्यक्त केलेली आहे. आत्मसदृश प्रजा उत्पन्न न झाल्याने (संतती) अनेक व्दिपांचा समावेश असलेली व अनेक रत्ने प्रसवणारी ही पृथ्वी मला आनंद देऊ शकत नाही असे तो म्हणतो संततीच्या अभावाने त्याला आनंद होत नाही असे तो गुरुंना खिन्न पणे सांगतो.

सोऽहमिज्याविशुद्धात्मा प्रजालोपनिमीलित:।
प्रकाशश्चाप्रकाशश्च लोकालोक इवाचल:।।६८।।

म्हणून यज्ञयागादिकांच्या योगाने माझे चित्त शुद्ध झालेले असले तरी संततीच्या अभावाने काळवंडलेला, लोकालो पर्वताप्रमाणे माझ्यावर ही प्रकाश व काळोख दोन्ही आहेत म्हणजे आनंद व दू:ख दोन्ही आहेत. **टीप :** (पूर्वीच्या कल्पनेप्रमाणे सपाट पृथ्वीच्या भवती लोकालोक पर्वताची भिंत असून आतल्या बाजूस सूर्य व चंद्रही ग्रह फिरतात. म्हणून या पर्वतावर एका बाजूस प्रकाश व दूसरीकडे अंधार असतो.)

लोकान्तरसुखं पुण्यं तपोदानसमुभ्दवम्।
संतति: शुद्धवंश्या हि परत्रेह च शर्मणे।।६९।।

तप, दान, इत्यादी गोष्टींपासून उत्पन्न होणाऱ्या पुण्याचे फळ परलोकी सुख प्राप्ती हे होय पण शुद्ध सत्वाची संतती ही इहलोकी व परलोकी कल्याण करणारी आहे.

तो पूढे गुरुंना विचारतो,

स्वत: प्रेमाने पाणी घालुन वाढवलेला आश्रम वृक्ष जसा वांझ निघावा त्याप्रमाणे मला संतति हिन पाहुन तुम्हाला वाईट कस वाटत नाही? संतति हिनतेची खिन्नता तो अनेक उदाहरणांनी सांगत असतो ही पिज मला 'अनिर्वाणस्य दन्तिन: प्रमाणे (ज्याने स्नान केले नाही असा हत्ती) असहय पिज देते. स्नान रहीत हत्तीला जशी साखळदंडाची पिज असहय होते त्या प्रमाणे हे अन्यमऋणम् (पैत्रुकऋणम्) मला असहय पिज देते शेवटी असहायपणे गुरुंना विनंती करतो, ''या पैपकऋणातुन मुक्ती मिळण्यासाठी मला काही उपाय सांगावा आम्हा इक्ष्वाकुवंशातील राजांना असाध्य गोष्टीची सिद्धी आपणच करु शकता''.

ऋषींची अशा रितीने प्रार्थना करत असता. तो ऋषी (वसिष्ठ मुनी) मासे झोपी गेल्यामुळे सरोवर जसे प्रशान्त असते त्याप्रमाणे क्षणभर डोळे मिटून ध्यानस्थ झाले.

कालिदास म्हणतो,

इति विज्ञापितो राज्ञा ध्यानस्तिमितलोचन:।
क्षणमात्रमृषिस्तस्थौ सुप्तमीन इव ऱ्हद:।।७३।।

प्रशान्त सरोवर आणि ध्यानस्थ ऋषी यांच्यातील साम्य कालिदासाने फारच सुंदर वर्णन केले आहे. ध्यान स्थितीमुळे ऋषींना त्याच्या संतति प्रतिबंधाचे कारण दिसले.

१.११ प्र. वसिष्ठ मुनींनी राजाला त्याच्या संतति हिनतेचे कोणते कारण सांगितले ?

वसिष्ठ हे मन्त्रकृत ऋषी होते. अस्त्र, शस्त्र मन्त्र हया तीन्ही सिद्धी त्यांना प्राप्त होत्या ध्यानाने अंतकरण शुद्ध झाल्याबरोबर त्यांना दिलीप राजाच्या संतति हिनतेचे कारण कळले. ते त्यांनी राजाला निवेदन केले. मुनी म्हणाले 'हे राजा, पूर्वी इंद्राची उपासना करुन तू उर्वीकडे (पृथ्वी) परत येण्यास निघाला असता तूझ्या वाटेत 'कल्पतरुच्छायां आश्रिता''। अशी सुरभी कामधेनू बसली होती. ते पूढे म्हणाले

धर्मलोपभयाद्राज्ञी मृतुस्नातामिमां स्मरन्।
प्रदक्षिणक्रियार्हायां तस्यां त्वं साधू नाचर:।।७६।।

स्त्री ऋतुस्नान असल्याचे लक्षात असल्यामुळे धर्मलोप होईल या भितीने प्रदक्षिणायोग्य अशा गमधेनूशी तू नीट वागला नाहीस. तीला प्रदक्षिणा घातली नाहीस. येथे तत्कालीन समाजस्थितीचाही आपल्याला बोध होतो. मुनींनी पूढे राजाला सांगितले, की राजाने मला तिरस्कारले आहे. त्यामुळे मत्त्रसुतिंअनाराध्य । (माझ्या संततिची आराधना केल्याशिवाय) तुला (दिलीपाला) संतति होणार नाही. असा कामधेनूने शाप दिला आहे. आकाशगंगेच्या खळखळाटात तो शाप तूला किंवा तूझ्या सारथ्याला ऐकूच आला नाही म्हणून हे दिलीपा

ईप्सितं तदवज्ञानाव्दिद्धि सार्गलमात्मन:।
प्रतिवन्धाति हि श्रेय: पूज्य पूजाव्यतिऋम:।।७९।।

तीची अवज्ञा केल्याने तूझी मनोकामना पूर्ण होऊ शकत नाही. पूजनीय लोकांची पूजा करण्यात भंग झाला असता स्वत:चे कल्याणही होत नाही. मुनींनी पूढे सांगितले की सध्या ती कामधेनू वरुणाच्या दीर्घसत्रांत हवी मिळावे म्हणून दरवाज्यावर भूजंग असलेल्या पाताळात आहे. मुनींनी त्याला सांगितले तरी त्या कामधेनूच्या कालवडीला कामधेनूचा प्रतिनिधी करुन भार्येसह शुध्दन्त: करणाने तिची आराधना कर ती प्रसन्न झाली तरी ती तुझे मनोरथ पूर्ण करेल.

इतके बोलत असतांनाच त्या मुनींच्या आश्रमातील नंदीनी नावाची पूज्य कामधेनू वनातून परत आली. नंदिनीचे वर्णन

ललाटोदयभाभुग्नं पल्लवस्निग्धपटला।
विभ्रती श्वेतरोमांड्क संध्येव शशिनं नवम्।।८३।।

ती नंन्दिनी पूज्यनिय तीची अंगकान्ती कोवळया पानाप्रमाणे तुळतुळीत व लालसर रंगाची तिच्या कपाळावर पांढऱ्या केसांची वाकडी चन्द्रकोर होती. व्दितीयेचा चन्द्र धारण करणाऱ्या संध्येप्रमाणे ती सूंदर दिसत होती.

आपल्या वत्साला बघून पान्हा फुटल्यामुळे ती आपल्या ओटीतूप स्त्रवणाऱ्या दुधाने (की जे यज्ञातील अवभूत स्थानापेक्षा पवित्र) अशा कोमट दूध ते जमिन सिंचन करत होती. राजाला आपल्या खूरांनी उडलेल्या धुळीने ती स्पर्श करत होती. जणू काही

तीर्थाभिषेकजां शुध्दिमादधाता महीक्षित:।

तीर्थाटनाने प्राप्त होणारी सिध्दी राजाला देत होती अशा त्या पूण्यदर्शन धेनूला बघून शुभाशुभ योग जाणणारा (निमित्तज्ञ:) तपोनिधी वसिष्ठ राजाला म्हणाला,

अदूरवर्तिनी सिद्धीं राजन्विगण यात्मन:।
उपस्थितेयं कल्याणी नाम्नि कीर्तित एव यत्।।६७।।

१.१२ प्र. वसिष्ठ मुनींनी राजाला कामधेनूची सेवा कश्याप्रकारे करायला सांगितली ?

मुनींनी नाव घेताच नन्दिनी तेथे त्यांच्या आश्रमात उपस्थित झाली. म्हणूनच मुनींनी मनोरथ पूर्ण होण्यासाठी तिची सेवा करण्यास सांगितले. ते राजाला म्हणाले तू वन्य वृत्ती धारण करुन ''**ग्राम आत्मानुगमनेन अभ्यसनेन विदंयाइव**'' (अभ्यासाने विदया प्रसन्न करुन घ्यावी तसे तीच्या मागोमाग राहून तीला प्रसन्न करुन घे.)

ते राजाला म्हणाले,

प्रस्थितायां प्रतिष्ठेया: स्थितयां स्थितिमाचरे:।
निषण्णायां निषीदास्यां पीताम्भसि पिबेरप:।।८९।।

ती चालु लागलीकी तू चाल, ती उभी राहीली की तू उभा रहा, ती बसली की तू बस ती पाणी प्यायली की तू सूध्दा पी. तुझ्या मायेने सूध्दा इन्द्रियनिग्रह करुन भक्ती यूक्त अंत:करणाने कामधेनूची पूजा-अर्चा करावी. सकाळी तपोवनाच्या सीमेपर्यन्त तीला पोचवण्यास जावे व संध्याकाळी घेण्यासही जावे. मुनी पुढे त्याला म्हणतात,

इत्या प्रसादादस्यास्त्वं परिचर्यापरो भव।
अविघ्नमस्तु ते स्थेया: पितेव धुरि पुत्रिणाम्।।९१।।

कामधेनू प्रसन्न होईपर्यत तू तीची तू तीची सेवा कर तुझ्या मार्गात विघ्न न येवो. पूत्रवत्तांच्या मालिकेत तुला अग्रभागी स्थान मिळो. अशा प्रकारे काळ-वेळ जाणणाऱ्या (देशकालन:) त्या राजाने आपल्या भार्ये सह गुरुची आज्ञा मानली. ब्रम्हपूत्र वसिष्ठाने नियमांच्या अपेक्षेने तपसिध्दीचे सामर्थ्य असुनही राजाला आश्रमयोग्य अशी शयनसामग्री दिली. त्या कुलपतीने वसिष्ठमुनींनी दाखवलेल्या पर्णशाळेत इन्द्रियनिग्रह केलेल्या पत्नीसमवेत राहून दर्भशयेवर निजून राजाने रात्र घालवली.

येथे कालिदासाने कुलपती शब्दाची योजना वसिष्ठांसाठी केली आहे. दशसहस्त्र ब्राम्हणांना अध्यापन करणारा अन्नदानादी पोषणाची व्यवस्था करणारा असा आश्रमपती असी कुलपतीची व्याख्या आहे. येथेच वसिष्ठाश्रमाभिगमन या पहिल्या सर्गाची सांगता होते.

१.१३ दिलीप वसिष्ठ संवाद

राजा दिलीप व राणी सुदक्षिणा वसिष्ठ मुनींच्या आश्रमात पोहचले. सांयकाळची वेळ होती. तेथील इंद्रियनिग्रह करणाऱ्या मुनींनी त्यांची पूजा केली. नंतर राजा-राणींनी वसिष्ठ मुनी व ऋषीपत्नी अरूंधती (सायंकाळची नित्यकर्मे आटोपल्यावर) यांचे पाय धरले. गुरूंनी त्यांना प्रेमाने आशीर्वाद दिले.

वसिष्ठ मुनींनी राजाला राज्याचे कुशल विचारले.

उत्कृष्ट वक्ता व पराक्रमी राजा दिलीप बोलले की हे माझ्या दैवी किंवा मानुषी आपदांचे निवारण करण्यास आपण समर्थ असता माझ्या राज्याच्या सातही अंगांचे कुशल असावे हे युक्तच आहे. (सात अंग :- स्वामी, अमात्य, सह्रदय, कोश, राष्ट्र, दुर्ग, बल)

हे गुरो! आपण आपल्या मंत्राच्या सामर्थ्याने पहिलेच शुत्रुंचा दुरूनच विनाश करता. केवळ डोळयांनी दिसणारा बाण शत्रुंचा विनाश झाल्याने व्यर्थ प्रतीत होतात.

हे हवन करणारे गुरो! आपण विधिपूर्वक अग्निमध्ये आहूती टाकत असल्यामुळेच दुष्काळाला दूर करणारी वृष्टी होऊन धान्य पिकते. हे गुरो, आपल्या व्रत, वेदपाठ व ब्रम्हतेजामुळेच माझी प्रजा शतायु, निर्भय व आपत्तीरहित आहे.

हे ब्रम्हपुत्र आपल्या सारख्या गुरूंनी अशाप्रकारे नेहमी माझी काळजी पाहिल्यावर माझ्या संपत्ती ची नेहमी भरभराट का नाही होणार?

हे गुरो! तथापि आपल्या हया स्नुषेच्या पोटी (राजपत्नी सुदक्षिणा) आत्मसदृश्य प्रजा उत्पन्न झालेली न पाहिल्यामुळे अनेक द्विपांचा समावेश करणाऱ्या ह्या पृथ्वीपासूनही मला आनंद होत नाही.

माझ्या पश्चात आपल्याला पिंड देणारा कोणी नाही असे पाहून स्वधनाचा संग्रह करणाऱ्या काळजीने माझे पितर श्राध्दसमयी पोटभर जेवतही नसतील असे वाटते. तसेच माझ्या पश्चात आपल्याला पाणी देणारा कोणी नाही असे पाहून आपल्या दु:खद श्वासांनी ते पाणी गरम करून पीत असतील असे वाटते.

यज्ञयागादिंमुळे देवऋणातून मुक्त होऊनही संपतीच्या अभावामुळे पितृऋणातून मुक्त न होण्यामुळे माझी स्थिती लोकालोक पर्वताप्रमाणे एका बाजूस प्रकाश तर दुसऱ्या बाजूस काळोख अशी आनंद व दु:ख ही दोन्ही प्रकारची आहेत.

पुण्यतप अथवा दानाने मिळणारे फळ परलोकी सुखप्राप्ती हे होय. परंतु शुध्दसत्त्वाची संतती ही इहलोकी व परलोकी कल्याण करणारी आहे.

हे गुरो! ज्याप्रमाणे स्वत:प्रमाणे पाणी घालून वाढविलेला आश्रमवृक्ष वांझ निघावा त्याप्रमाणे मला संततीहीन पाहून तुम्हाला वाईट वाटत नाही का?

हे भगवन! स्नानावाचून ठेवलेल्या हत्तीला ज्याप्रमाणे साखळदंडाची पीडा असहय होते त्याप्रमाणे हे माझे पितृऋण मला असहय पीडा देत आहे. म्हणून हे गुरो! जेणेकरून माझी ऋणातून मुक्तता होईन अशी घटना आपण घडवून आणावी.

इक्ष्वाकू वंशातील राजाना अशक्य असणारी गोष्टीचीं सिध्दी सर्वस्वी आपल्या अधीन आहे. अशारीतीने राजाने प्रार्थना केल्यावर तो ऋषी मासे झोपी गेल्यामुळे प्रशांत असलेल्या सरोवराप्रमाणे किंचीत् डोळे मिटून ध्यानस्थ झाला.

ऋषी :– ध्यानात ऋषीला राजाच्या संततीप्रतिबंधाचे कारण दिसले व ते लगेच राजाला म्हणाले,

पूर्वी एकदा तू इंद्राची उपासना झाल्यावर भूतलावर परत यावयास निघालेला असतांना तुझ्या वाटेत कल्पतरूच्या छायेत कामधेनु बसलेली होती. आपली स्त्री (राणी) ऋतुस्नानात असल्याचे लक्षात येताच अधर्म होईल हा विचार करून प्रदक्षिणा करण्यास योग्य असलेल्या धेनूशी तू नीट वागला नाही. प्रदक्षिणा केली नाहीस.

म्हणून कामधेनूने तूला शाप दिला की ज्याप्रमाणे तू माझा तिरस्कार केला त्या अर्थी माझ्या संततीची आराधना केल्याशिवाय तुला संतती होणार नाही.

उद्दाम दिग्ग्जांच्या योगाने आकाशगंगेच्या प्रवाह खळखळत असल्यामुळे तो शाप तुला किंवा तुझ्या सारथ्याला ऐकू आला नाही.

तिच्या हया अवज्ञेमुळेच तुझ्या मनोकामनेला प्रतिबंध झाला आहे. कारण पूजनीयांच्या पूजेत प्रतिबंध झाला असतानाही कल्याणाला प्रतिबंध होतो. सध्या ती कामधेनू वरूणांच्या दीर्घसत्रात 'हवी' मिळावा म्हणून दारावर भुजंग असलेल्या पाताळात आहे.

नंदिनी सेवाव्रत

नंदिनी सेवाव्रत : तथापि त्या कामधेनूची पुत्री तिला प्रतिनिधी करून भार्येसह शुध्द अंत:करणाने तिची आराधना करा. ती प्रसन्न झाली तरी ती तुझे मनोरथ पूर्ण करील. मुनी बोलत आहे तोच कामधेनूची पुत्री नंदिनी वनातून परत आली. तिला पाहताच मुनी म्हणाले.

हे राजा ज्या अर्थी नाव काढताच ही पुण्यकारक धेनु येथे उपस्थित झाली त्याअर्थी असे मनोरथ लवकरच पूर्ण होणार असे समज.

तेव्हा वन्यवृत्ती धारण करून रोज स्वत: तिच्या मागोमाग राहून अभ्यासाने ज्याप्रमाणे विद्या प्रसन्न करून घ्यावी तद्वतच तिला प्रसन्न करून घे.

ती चालू लागली म्हणजे तू चाल. ती उभी राहिली तर तू उभा राहा. ती बसली तर तू बस. ती पाणी प्याली की तू पाणी पी.

तुझ्या मायेने देखील इंद्रियनिग्रह करून भक्तीयुक्त अंत:करणाने पूजाअर्चा केल्यावर हया धेनूला सकाळी तपोवनाचा सीमेपर्यंत पोहचविण्यास जावे व संध्याकाळी घेण्यास जावे.

अशाप्रकारे ती प्रसन्न होईपर्यंत तू तिची सेवा कर. तुझ्या मार्गात विघ्न न येवो व पुत्रवतांच्या मालिकेत तुला अग्रस्थानी स्थान मिळो. काळवेळ जाणणारा तो वसिष्ठशिष्य आपल्या भार्येसह आनंदाने नम्रपणाने गुरु आज्ञा शिरसावंद्य मानली. नंतर मुनींनी भूपतीला रात्री निजावयास जाण्यास आज्ञा दिली.

१.१४ अपेक्षित प्रश्न संच

दीर्घोत्तरी प्रश्न

१. रघुवंशातील राजांचे गुण विस्तृतरित्या लिहा.
२. वसिष्ठाश्रमाच्या प्रवासाचे वर्णन सविस्तर लिहा.
३. दिलीप-वसिष्ठ संवादाचे विवेचन करा.
४. प्रथमसर्गानुसार कालिदासाचे उपमासौन्दर्य स्पष्ट करा.
५. प्रथमसर्गानुसार राजधर्माविषयी सविस्तर लिहा.
६. राजा दिलीपाचे चरित्राचित्राण करा.
७. प्रथमसर्गाचा सारांश लिहा.

टीपा

१. रघुवंशातील राजांचे गुण
२. वसिष्ठाश्रमवर्णन
३. वसिष्ठोपदेश
४. कालिदासाच्या उपमा
५. महर्षी वसिष्ठ
६. दिलीपाची गुरुनिष्ठा
७. महाकवी कालिदास

१.१५ संदर्भ ग्रंथ सूची

१. रघुवंश - रामप्रसाद सारस्वत, गणेश आश्रम बुक डेपो, आगरा.
२. रघुवंशम् महाकाव्यम् - श्री. ब्रह्मशंकरमिश्रः साहित्यशास्त्री, चौखंबा, संस्कृत संस्थान, वाराणसी.

२. कर्णभारम्

२.१ प्रस्तावना

'कर्णभार' हे संस्कृत वाङ्‌मयातील नावीन्यपूर्ण चर्चित नाटकांपैकीच एक नाटक आहे 'कर्णभार' या नाटकाचे नाटककार महाकवी भास हे आहेत. महाकवी भास यांची एकूण १३ नाटके आहेत या १३ नाटकामध्ये प्रत्येकाच नाटक हे वैशिष्टपूर्ण आहे.

महाकवी भासांच्या या १३ साहित्याला पुन: प्रतिष्ठित करण्याचे श्रेय 'महामहोपाध्याय गणपती शास्त्री' यांचे आहे महाकवी भास यांच्या नाटकातील कथा व कथेतील पात्र अत्यंत भावनाप्रधान दाखविले गेले आहे कवी भासांचे प्रत्येकच नाटक वैशिष्टयपूर्ण आहे. त्याची शैली, नाटकातील पात्रांचा व्यक्तीचित्रण हे कवी कालीदासांपेक्षा कुठेच कमी पडत नाही. त्यांच्या प्रत्येक नाटकाला संस्कृत वाङ्‌मयामध्ये एक वेगळी जागा निर्माण केली आहे. परंतु प्राचीन महाकवी प्रमाणेच भास यांच्या विषयामध्येही पाश्चात्त्य व पूर्वीय विद्वानांमध्ये परस्पर विरूद्ध मते आहेत.

महामहोपाध्याय गणपती शास्त्री व दिप्तीसार यांच्यानुसार महाकवीभास हे पाणिनी व कौटिल्य यांच्या पेक्षाही प्राचीन असावेत असे ते सांगतात. कवी भास हे द्वितीय शताद्वीच्या नंतर व पाचवी शताद्वीच्या आधीचे ते आहेत, असे डॉ कीथ यांचे मत आहे.

डॉ. वार्नट हे कवी भास यांना सातवी शताद्वीचे मानतात. अशाप्रकारे प्रत्येकाने आपले वेगवेगळे मत कवी भास यांच्यासाठी व्यक्त केले आहे ते स्पष्ट करण्यासाठी त्यांनी प्रमाण ही सांगितले आहे.

'महाकवी भास' यांची एकूण १३ नाटके प्रकाशित आहे. त्यामध्ये 'स्वप्नवासवदत्तम्' हे पहिले नाटक असून यामध्ये ७ अंक आहे. यामध्ये अतूट प्रेमाचे वर्णन केले.

- दुसरे नाटक 'प्रतिज्ञायोगन्धरायण' हे दुसरे नाटक आहे यामध्ये 'स्वप्नवासवदत्तम'च्या आधीची कथा वर्णित आहे. 'ऊरूभंग' हे तिसरे नाटक आहे. यामध्ये भीम व दुर्योधन यांचे भयानक गदायुद्ध वर्णिली आहे हे संस्कृत वाङ्‌मयातील एकच नाटक असे दु:खाना नाटक आहे.
- 'दूतवाक्य' :- हे चौथे नाटक आहे यामध्ये कृष्ण पांडवाचा दूत बनून कौरवांकडे जातो व दुर्योधनाच्या सभेतून निराश होऊन येतो. त्या सभेतील कृष्ण व दुर्योधनाच्या कथोप कथनाचे वर्णन या नाटकात आहे.
- 'पंचरात्र' :- हे तीन अंकाचे नाटक आहे. यामध्ये पांडवाची अज्ञातवासातील ५ रात्रीमध्येच पाण्डव मिळल्याने दुर्योधनाचे अर्धे राज्य दृयावे लागते याची कथा वर्णित आहे.
- 'दूतघटोत्कच' :- अभिमन्यूचा वध व त्यानंतर अर्जून प्रतिज्ञा करणे व धृतराष्टाजवळ विनाशची सूचना देतो व भयंकर युध्द याचे वर्णन व सोबतच घटोत्कच व दुर्योधन यांचा वार्तालाप यांचे खूपच सुरेख वर्णन यामध्ये दिसते.
- 'कर्णभार' :- हे सहावे नाटक कर्णावर आधारीत आहे कर्णाची दानवीरतेचे वर्णन यामध्ये आहे. माध्यमव्यायोग यामध्ये भीमाचे ब्राम्हण कुमाराचे रक्षण करणे व हिडिम्बा ला भेटणे याचे खूपच सरस व कौतुहलपूर्ण वर्णन आहे.
- 'प्रतिमा' :- हे सात अंकाचे नववे नाटक आहे यामध्ये राम वनवास ते रावण वध ही कथा वर्णित आहे.
- 'अभिषेक' :- हे दहावे सहा अंकाचे नाटक रामायण व किष्किंधा, सुंदर आणि युध्द काण्डांचे संक्षिप्त वर्णन यामध्ये आहे. शेवटी रामराज्यभिषेक दाखविण्यात आलला आहे. अविमारक, चारूदत्त आणि बालचरित ही अन्य तीन नाटकेही भासनेच रचलेली आहेत.

याप्रमाणे भास यांची १३ नाटके प्रकाशित आहे. त्यांची बहुतेक नाटक हे कल्पनेवर आधारीत आहे तर भावपूर्ण आहे. त्यांच्या नाटकातील स्त्री असो वा पुरूष हे नेहमी सामान्य भूमिकेतच आहेत आणि म्हणूनच त्यांची नाटक पाहतांना किंवा वाचतांना त्यातील पात्रांविषयी पूर्ण सहानूभूती वाटते. त्यांच्या नाटकातील दैविगुण संपन्न पात्र सुद्धा जसे राम, सीता, कृष्ण यांच्यात पण मानवीय भावनांची झलक दिसते आणि मोरवर्य यांनी भास यांच्या गुणांची प्रशंसा केली आहे.

२.२ उद्‌देश

१. महाकवि भास यांचा परिचय करणे.

२. कर्णाच्या गुणांचे टीकात्मक परीक्षण करणे.

३. संस्कृत नाटकांचा अभ्यास करणे.

२.३ कवि भासाची काव्यशैली

रचना विधानाच्या दृष्टीने विचार केल्यास या नाटकात काही दोष आहेत जे एका प्रथितयश नाटककारासाठी खटकतात. नाटकाच्या आरंभी कर्ण शल्यास सांगतो कि 'जिथे अर्जुन आहे तिथे माझ्या रथाला घेऊन चल.' नंतर काही वेळाने कर्ण आपल्या अस्त्रविद्येची प्रासंगिक कथा समाप्त करुन घेतो तर पुन्हा दोघेही रथावर बसतात आणि कर्ण म्हणतो कि, 'अर्जुनाजवळ माझा रथ घेऊन चल.' दोघेही रथावर बसल्यानंतर कदाचित ब्राह्मणाचा ओजस्वी स्वर ऐकू आला असावा. शेवटी पुन्हा ते रथावर बसतात असा रंगमंचीय निर्देश पुन्हा होतो. या रंगभंचीय निर्देशाची त्रुटि खूप मोठी चूक आहे. याने अभिनयामध्ये समस्या उपस्थित होऊ शकते की, केव्हा कर्ण रथावर आरुढ होतो आणि केवहा उतरतो?

संकलनत्रंयाच्या निर्वाहामध्ये नाटक पूर्णपणे सफल आहे. यातील सर्व घटना एकाच स्थानी एकाच वेळी आणि मोजक्या पात्रांद्वारे तसेच एकाच मुख्य ध्येयाकडे उन्मुख व अग्रेसर झालेली दिसते.

कर्णभाराला नाट्यरचनेच्या कोणत्या प्रकारात बसवावे. ही एक समस्या आहे. हे व्यायोग होऊ शकत नाही कारण यांत कोणताही संघर्ष किंवा युद्धादि नाही किंवा वीररसही नाही. याला 'उत्सृष्टिकाक्ङ' नावाचे एकांकी नाटक मानल्या जाऊ शकतो. दशरुपक्काराने याची व्याख्या अशाप्रकारे केली आहे –

''उत्सृष्टिकाक्ङे प्रख्यातं वृत्तं बुद्ध्या प्रपञ्चयेत्।
रसस्तु करुणः स्थायी नंतारः प्राकृता नराः।।
भाणवत्सन्धिवृत्त्यङ्गैर्युक्तः स्त्रीपरिदेवितैः।
वाचा युद्धं विधातव्यं तथा जयपराजयौ।।''

(दशरूपकम् ३ प्रकाश : ७०–७२)

कथानक प्रख्यात ऐतिहासिक प्रबन्धकाव्य महाभारताचे आहे ज्यात कल्पनेचाही पर्याप्त योग आहे. करूणरसाची अनुभूति सुरूवातीपासून शेवटपर्यंत बनून राहते. यांत कुठेही दैवी व्यक्ती आलेली नाही. इंद्रही मनुष्यरूपातच येतो. यांत केवळ मुख निर्वहण संधी आहेत, तसेच केवळ वाग्युद्धाचेच विधान आहे. ते केवळ युद्धाच्या पृष्ठभूमिवर उपस्थित केलेले आहे. यांत स्त्रीपात्रांची योजना किंवा स्त्रीरुदन नाही. वस्तुतः भासाच्या नाटकांना शास्त्रीय दृष्टीने पूर्णतः एकाच श्रेणीमध्ये बसवता येत नाही. परंतु प्रस्तुत नाटक हे अंक किंवा उत्सृष्टिकाक्ङ यांच्या अधिक जवळचे वाटते.

काव्यतत्त्व

भासाने आपल्या नाटकांमध्ये काव्यतत्त्वाचा अधिकाधिक यद्यापि कोणताही स्पष्ट प्रयत्न दिसत नाही परंतु समग्र नाटक वाचल्यावर किंवा पाहिल्यावर द्रष्ट्याचा (प्रेक्षकाच्या) ह्रदयात करुणभाव जागृत होतो. संपूर्ण वातावरणात करुण्याची पुसट छाया विद्यमान राहते. डॉ. पुशलकर इंद्राचे ब्राह्मणवेश धारण केल्यावर प्राकृत बोलणे हास्याचे पुट मानतात. कर्णासारख्या महारथी योद्ध्यासाठी युद्धप्रसंगी दैन्यभाव म्हणजे उद्भवसूर्याचे ज्येष्ठमासामध्ये मेघांनी आच्छादल्या समान आहे.

''अत्युग्रदीप्तिविशदः समरेऽग्रण्यः शौर्ये च सम्प्रति सशोकमुपैति धीमान्।
प्राप्ते निदाघसमये धनराशिरूद्धः सूर्यः स्वभावरुचिमानिव भाति कर्णः।।''

(कर्णभारम् ४)

कविने उक्त वसंततिलकेमध्ये अप्रस्तुतविधानाद्वारे कर्णाच्या स्थितीची जीवन्त उपमा दिली आहे. 'अयं स कालः क्रमलब्धशोभनो' इत्यादि श्लोकांद्वारे कर्णाची असहायता व मानसिकद्वन्द्व स्पष्ट होऊन जाते. इतक्या उदात्तचरित्राला वारंवार वंचित आणि दुःखित दाखवून कवीने कारुण्याची अजस्रधारा प्रवाहित केली आहे.

२.४ महाभारतातील आख्यान आणि कर्णभार

१. वनपर्वाच्या ३००-३१० अध्यायांमध्ये सूर्य कर्णाला इंद्राच्या कपटलीलेपासून वाचवण्यासाठी कर्णास सावध करतो. ही कथा ज्या भागात वर्णित आहे, त्याला कुंडलहरणपर्व म्हटल्या जाते. जेव्हा कर्ण सूर्याच्या या गोष्टीकडे लक्ष देत नाही. तेव्हा सूर्य कर्णाला इन्द्राकडून कवच व कुण्डलाच्या मोबदल्यात मायाविनी शक्ति मागण्यास सांगतो. महाभारतातीस सूर्याच्या या सल्ल्यानुसार इंद्राकडून ती शक्ति प्राप्त करतो, जिच्याद्वारे नंतर घटोत्कचाचा मृत्यू होतो. ही कथा शान्ति आणि वनपर्वाच्या अतिरिक्त आदिपर्वाच्या अनतर्गत सभापर्वाच्या अध्याय ६८/४४-४५ आणि अध्याय १२०/३९-५३ मध्ये निबंद्ध आहे.

२. कर्णाचे अर्जुनासोबत घोर युद्धसंघर्ष व अर्जुनाद्वारे कर्णाच्या वधाची कथा कर्णपर्वामध्ये निबद्ध आहे. कर्ण कौरवीसेनेचे संचालन करत असताना अर्जुना हरवण्यासाठी कटिबद्ध होतो. अर्जुनासाठी ज्याप्रमाणे श्रीकृष्ण सारथी होते त्याप्रमाणे कर्णासाठी शल्यराज. ज्याप्रमाणे श्रीकृष्ण ह्या अटीवर रथ चालवणे स्वीकारले होते कि ते रणक्षेत्रांमध्ये अस्त्र ग्रहण करणार नाही त्याप्रमाणे शल्यानेसुद्धा हे वचन घेतले होते कि कोणत्याही वेळी तो कोणालाही जे वाटेल ते बोलू शकतो व त्याच्या वचनाला तोडण्याचा कोणालाही अधिकार नव्हता.

महाभारतातील शल्य अनेक कटुवचन बोलतो आणि कर्णाच्या निर्बलतेचे वर्णन करुन त्याचा उत्साह भंग करतो. तो अनेक अपशकुन दाखवून प्रत्येक गोष्टींवर कर्णाबरोबर भांडत बसतो. अशाच परिस्थितीमध्ये राहून कर्ण पाच पांचालांना मारतो आणि युधिष्ठिराला निःशस्त्र करून त्यांचा अपमान करतो.

३. कर्णाची अस्त्रशिक्षा आणि परशुरामाच्या अभिशापाची कथा महाभारताच्या कर्णपर्वाच्या २६ व्या अध्यायात आणि शांतिपर्वाच्या तीसऱ्या अध्यायात वर्णित आहे.

अशाप्रकारे दिसते कि, कर्णाची इतस्ततः विसुरलेली कथा संघटित करुन एक असे संघटनात्मकरुप उपस्थित केले आहे जो आपल्या समग्रतेमध्ये एक प्रभाव उत्पन्न करु शकेल.

२.५ मूळस्रोतांपासून कथेचे अंतर

१. मूळ कथेनुसार इन्द्राचे ब्राह्मण भिक्षुकाच्या रूपांमध्ये येण्याचा व कर्णाकडून कवच व कुंडलाचे दान मागण्याचा प्रसंग खुप अगोदरच वर्णित आहे जेव्हा पांडव जंगलामध्ये निवास करीत होते, परंतु कवीने या घटनेचे संयाजन युद्धासाठी जात असलेल्या सैनिकांमध्ये उपस्थित कर्णासोबत केले ज्यामुळे एक प्रभावालाकता उत्पन्न होते व अचानक या घटनेच्या घटित झाल्यामुळे आश्चर्य, कुतुहल व करूणतेची एक खोल, गंभीर अनुभूति वारंवार प्रेक्षकांना कर्णाबद्दल सहानुभूति व्यक्त करण्यासाठी विवश करते.

२. महाभारतामध्ये सूर्य पूर्वीच कर्णाला स्वप्नामध्ये येऊन सावध करतो कि इंद्राच्या कपटलीलेला बळी नको पडू, परंतु कवीने या कथांशाला काढून टाकले, कारण, यांमुळे पूर्वोक्त घटनेचा प्रभाव आणि कुतुहल जागृत करण्याची क्षमताच नष्ट झाली असती. संभवतः यांमुळे वेळ, घटना व क्रियेची अन्विति बनली नसती.

३. मुळकथेमध्ये कर्ण इंद्राकडून शक्तिची स्वतः याचना करतो परंतु कवीभासाने आपल्या चरित्रनायकाला अशा उच्च भूमिकेवर प्रतिष्ठित केले कि संभवतः त्यामुळे प्रतिदानाची इच्छाही तिथे शोभनीय नाही. म्हणून तो आपले कवच कुण्डल निःसृहपणे दान करतो व देवदूताच्या सांगण्यावरूनही त्या मोबदल्यात इंद्रदत्तशक्तिचे ग्रहण करु इच्छित नाही. अंततः स्वतः वेवदूत त्यास ब्राह्मणवचन वरिपालनासाठी शक्ति स्वीकारण्यास सांगतो म्हणून कर्ण शक्ति स्वीकारतो जेणेकरून ब्राह्मणाच्या आशेचे उल्लंघन होऊ नये.

४. नाटकातील शल्याचे महाभारतातील शल्यापासून बरेच अंतर आहे. नाटकातील शल्य एक मृदुभाषी शुभचिंतक व

कर्णाचा सहायक म्हणून प्रतीत होतो. महाभारतातील शल्य क्रुर, निर्दयी, कर्णविरोधी व प्रत्येक वेळी कर्णाला कदुवचन बोलून आघात करणारा असा आहे.

५. नाटकातील एक मोठी आश्चर्य व कुतुहलाची गोष्ट म्हणजे कि, ब्राह्मणवेशधारी इंद्र प्राकृत भाषेचा प्रयोग करतो. वस्तुतः सर्वमान्य नियम आहे कि, केवळ भृत्य किंवा अशिक्षित वर्ग आणि स्त्रीया यांनी प्राकृतभाषेचा प्रयोग करावा, तेव्हा एक शास्त्रज्ञ ब्राह्मणाचे अशाप्रकारे बोलणे अस्वाभाविक आणि शंकास्पद वाटते.

डॉ. जी.के. भट्ट यांच्या 'The Problem of Karnabhara' या निबंधामध्ये कर्णभारच्या समस्येवर विचार करताना लिहतात कि, कवीभासने कर्णाच्या कथेमध्ये काही नवीन गोष्ट जोडून त्याला पूर्णरूप दिले. या गोष्टी कविकल्पित आहेत. या विचारमालेमध्ये ते कर्णाच्या त्या रूपाचे वर्णन करतात जे कविने आपल्या नाटकासाठी निवडले. कर्ण ज्यावेळी रंगमंचावर येतो त्यावेळी त्याचे मानस अनेक बाधा व त्यापासून उत्पन्न चिंतेमुळे ग्रस्त होते. हि स्थिति शेवटपर्यंत बनून राहते आणि या मानसिक दशेमध्येच तो आपल्या शास्त्रशिक्षणाची व परशुरामाच्या अभिशापाची गोष्ट शल्याला सांगतो.

श्री. देवधर यांच्या विचाराने हे कथानक काही अंशी बरोबर नाही. महाभारताच्या शल्यपर्वाच्या अंतर्गत ३६ व्या अध्यायामध्ये निबद्ध कथा अशाप्रकारे –

कर्ण शल्याला आपल्या श्रीकृष्ण व अर्जुनादि सोबतच्या युद्धाचे वर्णन करता करता एक पीडेची व उद्विग्नतेची गोष्ट सांगतो. तो सांगतो कि फार पूर्वी कधीतरी त्याने कशाप्रकारे अजाणतेपणी एक ब्राह्मणाच्या पवित्र गायीच्या वासराची निर्मभ हत्या केली व याने कुपित त्या ब्राह्मणाने त्याला शाप दिला कि जेव्हा युद्धक्षेत्रामध्ये तुझ्या रथाचे चाक पृथ्वीमध्ये फसेल तेव्हा तुझी अशाचप्रकारे तुझ्या शत्रुंकडून निर्मभ हत्या होईल. त्याच वेळी त्याने शल्यास आपल्या कपटव्यावहाराने अर्जित म्हणून परशुरामाच्या शापाने व्यर्थ झालेल्या अस्त्रविधेची कथा सांगितली. तो अर्जुनाला घाबरत नाही न श्रीकृष्णाला परंतु ब्राह्मण व परशुरामाचा शाप त्याच्या मानसावर एक दडपण बनून आहे.

इंद्राचे कवच व कुंडल प्राप्त केल्यानंतर पश्चाताप करणे त्याच्या सहृदयतेचे द्योतक आहे, त्याचे कलस्वरूप म्हणून तो स्वतः देवदूत पाठवून त्याला अमोघ शक्ति देतो. हा कविच्या भावना व मौलिक कल्पनेचाच परिणाम आहे.

२.६ कर्णभाराचे कथानक

नान्दीपाठानंतर सूत्रधार असा निर्देश करतो कि असण्याची देण्यासाठी घाईने जात आहे. कर्णला युद्धाच्या साजसज्जेने सज्जित पाहुन भटाला (सैनिकाला) दुर्योधनाच्या आज्ञेचे निवेदन करण्याची आवश्यकता वाटली नाही. म्हणून तो स्वतः युद्धक्षेत्राकडे शल्यराजासह प्रस्थान करतो. त्याला हेसुद्धा कळते कि कर्ण ज्याप्रकारे आपल्या शिबिरातून बाहेर आले आहे. तसेच त्यांचे हृदयही अनेक आगत–अनागत चिंता व आशंकेने व्याप्त आहे. कर्णाचा रंगमंचावर यथानिर्दिष्ट रूपात प्रवेश होतो. त्याचे प्रथमच वाक्य ओजीमय आहे. प्रवेश करताच तो म्हणतो कि, अर्जुन आज रणक्षेत्री दिसलाच तर माझ्या तीक्ष्ण बाणांनी आजच कौरवांची इष्टसिद्धि करेल. तो शल्यास ज्या ठीकाणी अर्जुन आहे त्याठीकाणी रथ घेऊन जाण्यास सांगतो.

ज्याप्रमाणे धगधगत्या आगीवर हळूहळू राख जमा होऊ लागते, त्याप्रमाणे कर्णाच्या या उग्रविचारांवरही चिंतेचे सावट जमू लागतात. स्वतः कर्णालासुद्धा आपल्या या असंभावित उदासीनतेबद्दल अत्यंत असंतोष वाटतो. तो म्हणतो कि, युद्धप्रसंगी शत्रुंच्या चतुरंगिणी सेनेवर बाणांची वर्षा करताना मी क्रुद्ध यमराजासारखा भासतो पण आज या शुभप्रसंगी माझ्या मनात उत्साह व वीरतेचा भाव जागृत होण्याऐवजी उदासीनता व निर्वार्यतेची स्थिती का उत्पन्न होत आहे? आपल्या अप्रासंगित मानसचिंतेचे विश्लेषण करताना महारथी कर्ण शल्याला आपल्या संपूर्ण वृत्तान्त वर्णित करून सांगतो. मोठ्या कष्टाने तो सांगतो कि, प्रथम तो कुंतीच्या गर्भातून उत्पन्न झाला. नंतर राधा नावाच्या एका अज्ञात व कुलशील स्त्रीने त्याचे पालनपोषण केले ज्यामुळे समाजात (लोकांमध्ये) तो 'राधेय' (राधापुत्र) या नावाने प्रसिद्ध झाला. आज त्यालाच त्याच्या युद्धिष्ठिराहि लहान भावंडांसोबत युद्ध करावे लागत आहे. खुपकाळापासून ज्याची प्रतीक्षा होती ती वेळ आली आहे व वैश्यांची अभिलाषा पूर्ण करण्यासाठी तो कृतसंकल्प आहे. परंतु अनेक

बंधन, अभिशाप आणि वचनांद्वारे तो स्वतःला अडकलेला पाहतो.

ज्याप्रकारे कोणी आपल्या दैन्याची कथा आपल्या साथीदाराला बसून सांगावी त्याप्रमाणे कर्ण आपला सारथी शल्याला सांगतो. आपल्या अस्त्रशिक्षेच्या व्यर्थ्यतेची कथा सांगताना कर्ण म्हणतो, प्रथम मी परशुरामाच्या आश्रमात शस्त्रशिक्षा प्राप्त करण्यासाठी गेलो आणि त्या दिव्यज्योतिने सुशोभित अद्‌भूत छविच्या त्या परशुला धारण करण्याऱ्या दिव्य आभाने मण्डित जामदग्न्यांना (जमदग्नीचे पुत्र; परशुराम यांना) प्रणाम करून शांतपणे एका कोपऱ्यात उभा झालो.

परशुरामांनी मला आशीर्वाद दिले आणि विचारले, 'आपण कोण? कोणत्या प्रयोजनाने येथे आले आहात?' मी म्हणले, आपलांकडुन समस्त शस्त्रास्त्र विद्या प्राप्त करण्यासाठी आलो आहे. त्यांनी सांगितले कि मी केवळ ब्राह्मणांनाच शिक्षा देतो; क्षत्रियांना व ब्राह्मणेतर वर्गाला नाही, मी त्यावेळी गुरूसोबत कष्ट करून, आपण ब्राह्मण असल्याचे सांगून अस्त्रशिक्षा ग्रहण करू लागलो.

एकदा जंगलातून फळफुल इत्यादि आणण्यासाठी एकटेच जात असताना माझ्या अनुरोधाने मला सोबत घेऊन गेले. वनमध्ये अधिक भ्रमण केल्यामुळे गुरूवर थकून माझ्या मांडीवर डोके ठेवून झोपी गेले. तेव्हा एक वज्रमुख नावाचा किडा माझ्या मांडीचा चावा घेऊ लागला. त्या असह्य पीडेचे गुरुवर झोपेतून उठू नये. म्हणून मी धैर्यपूर्वक सर्व सहन करू लागलो. काही वेळाने जेव्हा त्यांची झोप पूर्ण झाली तेव्हा आपल्या वस्त्राला रक्तरंजित पाहून माझ्या धैर्य व साहसावरुन मी क्षत्रिय असल्याचे समजून ते क्षुद्ध झाले. त्यांनी शाप दिला कि वेळ आल्यावर माझे अस्त्र व्यर्थ सिद्ध होईल. म्हणून यावेळी माझे अत्यंत उग्र व शक्तिशाली अत्रही यावेळी निर्बल व तेजहीन प्रतीत होत आहेत. आज तर माझ्या सेनेतील घोड, हत्तीसुद्धा उन्मत्तहीन होऊन मला परत जाण्यास विवश करीत आहेत शंख आणि दुन्दुभि निःशब्द होऊन गेले आहेत. या गोष्टी ऐकून शल्याला मोठा क्षोभ होतो. कर्ण एका खऱ्या योद्ध्याप्रमाणे त्याच्या क्षोभाचे निवारण करुन म्हणतो कि त्याने कोणत्याही प्रकारची चिन्ता करु नये. क्षत्रियांसाठी रणामध्ये मरणे किंवा विजयी होणे हे समान श्रेयस्कर आहे. जर तो विजयी झाला तर अनंत सुख उपभोगेल आणि वीर गतिस प्राप्त झाला तर स्वर्गाचे दार त्याच्यासाठी उघडल्या जातील.

'ब्राह्मण, सती स्त्री व योद्ध्यांचे कल्याण होवो. मी प्रसन्न आहे. हा शुभ अवसर मला उपलब्ध झाला आहे म्हणून मी आता समरसीमेमध्ये प्रवेश करुन युधिष्ठिराला बांधून पराक्रमी अर्जुनाला तीक्ष्ण शराघातांनी घायाळ करुन सर्व सेनेला ध्वस्त करेल.'

अशाप्रकारचा दृढ निश्चय करून तो रथावर चढतो व शल्यराजाला पुनः रथ तिथे घेऊन जाण्यास सांगतो जिथे अर्जुन आहे. एकीकडे युद्धप्रस्थानाची तयारी सुरू असताना दैवाचा वाईट परिणाम म्हणून एक भिक्षुक (ब्राह्मणवेशामध्ये स्वतः देवराज इंद्र) येतो व मोठ्या भिक्षेची मागणी करतो. त्याला आदरपूर्वक प्रणाम करून त्यास संतुष्ट करण्यासाठी दानवीर कर्ण सहस्र गायी देण्यासाठी तत्पर होतो पण हट्टी भिक्षुक ते स्वीकारत नाही. मत्त गजराजांचा समूह देण्यासाठी कर्ण तयार होतो परंतु ते सुद्धा त्याला नाही पाहिजे. काबुली घोडे, अनंत स्वर्ण व वसुन्धरा देऊन सुद्धा तो घेण्यास तयार होत नाही. शेवटी जेव्हा कर्ण आपले शिर समर्पित करु लागतो. तेव्हा घावरून 'अविहा अविहा' (ईश्वर रक्षण करो) असे म्हणून लागतो. असंतुष्ट भिक्षुकाला परत पाठवणे कर्णाला असह्य होते. म्हणून तो आपल्या शरीरासोबत अद्भूत कवच व कुंडले देण्याचे वचन देतो. त्याचे हे वचन ऐकून ब्राह्मण वेशधारी इंद्र प्रसन्न होतो व दान ग्रहण करण्यासाठी तयार होतो. तेव्हा कर्णाला यांत तीळमात्रही शंका राहत नाही कि, हा उपाय कपटबुद्धि कृष्णाचा आहे. परंतु आधीच वचन दिल्यामुळे अशाप्रकारचा वितर्क अशोभनीय असल्यामुळे तो प्रसन्नचित्ताने कवचकुंडले देऊन देतो. शल्यराजास इंद्राचे कपट सहन होत नाही. म्हणून तो कर्णाला दान देण्यापासून थांबवतो. परंतु कर्ण त्याला म्हणतो कि या असार संसारामध्ये काहीच शाश्वत नाही आणि काही नित्य आहेच तर अग्निमध्ये अर्पित केलेली आहुति व सत्पात्री दिलेले दान.

इंद्र कर्णाकडून कवचकुंडले घेऊन घेतो पण या प्रसंगानंतर त्याच्या मनात ग्लानि निर्माण होते म्हणून तो

आपल्या दूताद्वारे विमला नावाच्या अमोघ अस्त्राचे वरदान पाठवतो पण दानी कर्ण आपल्या दानाचे प्रतिदान इच्छित नाही. ते तो स्वाकारत नाही पण ब्राह्मणवचनाचा आदर राखण्यासाठी तो त्याचा स्वीकार करतो.

कर्णामध्ये आपल्या कर्तव्याची भावना पुनः जागृत होते आणि तो रथावर चढून आपल्या सारथी शल्याला तिथे रथ घेऊन जाण्यास सांगतो जिथे त्याच्या प्रतिद्वन्द्वी अर्जुन आहे. यानंतर नाट्यपरंपरेनुसार भरतवाक्याने नाटकाची परिसमाप्ति होते.

अशाप्रकारे संपूर्ण कथनकात कर्णाच्या उदात्त भावना व दानशुरतेच्या उज्ज्वल गाथेबरोबर त्याच्या कठिण परिस्थितीचे मार्मिक उद्‌घाटन आहे.

२.७ कर्णभाराचे भाषांतर

नांदीच्या शेवटी सूत्रधार प्रवेश करतो.

सूत्रधार : ज्या विष्णूच्या नृसिंहाच्या शरीराला बघून नरनारी राक्षस देवगण आणि पाताळलोक आश्चर्यचकित झाले, ज्यांनी आपल्या कठोर नखे असलेल्या बोटांनी दैत्यराज हिरण्यकश्यपूचे हृदय विदीर्ण केले अशा राक्षसांच्या सैन्याचा पराभव करणारे भगवान विष्णू सगळ्यांचे कल्याण करो.

अशाप्रकारे मी या आदरणीय रसिकांना सांगतो, (फिरून कान देऊन) अरे सूचना देण्यात व्यग्र असलेल्या मला हे काय बरे ऐकायला येत आहे? ठीक आहे. आतं बघतो.

(पडद्यात)

अरे अंग देशाचा राजा कर्ण यांना निवेदन करा. (सांगा)

सूत्रधार : अच्छा समजले.

दुर्योधनाच्या आज्ञेने घाबरलेला, हात जोडलेला सेवक कर्णाला भयंकर युद्ध होण्याची सूचना देतो आहे

(सगळे जातात)

प्रस्तावना

(प्रवेश करतो)

अरे अंगेश्वर कर्णाला सांगा. मोठ्या युद्धाची वेळ आली आहे.

आज अर्जुनाच्या ध्वजासमोर सिंहाप्रमाणे असलेले राजे जे हत्ती घोडेयावर आरूढ झाले आहेत (ते राजे जयघोष करीत आहेत आणि अपराजित शक्ती असलेल्या (नागकेतू) दुर्योधनाने युद्धासाठीचे आवाहन ऐकून लगेचच प्रस्थान केले।।३।।

(फिरून, बघून)

अरे हे अंगराज कर्ण युद्ध वेश धारण करून शल्यराजासोबत(सारथी) आपल्या भवनातून निघून त्याच दिशेने (युद्धभूमी) कडे जात आहे. अरे युद्धरूपी उत्सवाचा प्रमुख असलेल्या पराक्रमी कर्णाचाहा अभूतपूर्व मानसिक संताप कसा?

इथे अत्यंत पराक्रमी युद्धामध्ये सर्व प्रमुख अत्यंत बलवान कर्ण बुद्धिमान असून सुद्धा यावेळी दुःखाने ग्रीष्म ऋतूतील प्रखर किरणांचा सूर्य ज्याप्रमाणे मेघमंडळाने आच्छादित होतो त्याप्रमाणे कर्ण दुःखाने परीतप्त झाला आहे।।४।।

ठीक. मी जातो.(जातो)

नंतर पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे कर्ण व शल्य प्रवेश करतात.

कर्ण : नाही आज पर्यंत असे कधीच झाले नाही की माझ्या बाणांचे लक्ष्य ठरलेले राजे-महाराजे जिवंत राहिले, जर युद्धामध्ये अर्जुन दिसला तर मी कौरवांचे हित पूर्ण करतो।।५।।

शल्यराज! जिथे अर्जुन आहे तिथे रथ ने.

शल्य : ठीक. घेऊन जातो

कर्ण : अरे हे कसे झाले?

ज्याच्या अतुलनीय शक्तींची तुलना क्रुद्ध झालेल्या यमराजाशी होते आणि जो युद्ध क्षेत्रात दोन्हीकडे शस्त्रांचे प्रहार करून अनेक योद्धा, घोडे, रथ आणि हत्तींचे तुकडे करीत होता अशा माझ्या मनात युद्धाची वेळ जवळ येता दौर्बल्य येत आहे।।६।।

अरे अत्यंत कष्ट आहे.

पूर्वी कुंती पासून जन्मला असताना सुद्धा राधेचा पुत्र म्हणून जगात प्रसिद्ध झालो म्हणून युधिष्ठीर इत्यादी पाचही पांडव माझे कनिष्ठ बंधू आहेत।।७।।

अतिशय उपयुक्त आणि अनेक दिवसांपासून वाट बघत असलेला हा दिवस (ही वेळ) आला पण माझी अस्त्रविद्या यावेळी निष्फळ झाली आहे आणि आईने (कुंतीने) माझी अडवणूक केली आहे।।८।।

हे शल्यराज माझ्या अस्त्रांचा वृत्तान्त ऐक.

शल्य : हा वृत्तांत ऐकायला मी सुद्धा अतिशय उत्सुक आहे.

कर्ण : मी पहिले जामदग्न्य (परशुराम) ऋषीं जवळ गेलो होतो

शल्य : नंतर काय झालं?

कर्ण : नंतर......

विद्युल्लतेप्रमाणे पिवळ्या आणि लांब जटा समूह असलेल्या आणि सभेचे वलय असलेल्या परशुधारण केलेल्या ऋषींमध्ये श्रेष्ठ असलेल्या भृगु वंशाच्या ध्वजाचे आणि क्षत्रियांचे विनाशक असलेल्या परशुरामाच्या जवळ जाऊन (मी त्यांना) नमस्कार करून स्तब्ध होऊन एका बाजूला उभा राहिलो.।।९।।

शल्य : नंतर काय झालं?

कर्ण : नंतर परशुरामांनी आशीर्वाद देऊन मला, ''तुम्ही कोण आहात आणि इथे कशासाठी आला आहात?'' असे विचारले.

शल्य : नंतर काय झाले?

कर्ण : तेव्हा, ''हे भगवान (मी) संपूर्ण अस्त्रविद्येचे शिक्षण घेऊ इच्छितो''. असे मी म्हटले.

शल्य : नंतर काय झाले?

कर्ण : तेव्हा परशुरामांनी सांगितले, ''मी फक्त ब्राह्मणांनाच (अस्त्र विद्येचा) उपदेश करतो''. क्षत्रियांना नाही.

शल्य : परशुरामांचे तर क्षत्रिय वंशाशी जुने वैर आहे. नंतर काय झाले?

कर्ण : तेव्हा, 'मी क्षत्रिय नाही' (असे सांगून मी) अस्त्रविद्या शिकण्यास प्रारंभ केला.

शल्य : नंतर काय झाले?

कर्ण : नंतर काही दिवस गेल्यावर मी एकदा गुरुंसोबत फळे, मूळे, समिधा, कुश, (गवताचं टोक) फुलं आणण्यासाठी जंगलात गेलो होतो.

शल्य : नंतर काय झाले?

कर्ण : तेव्हा वनात फिरल्यामुळे परिश्रमाने थकून गुरुवर्यजी माझ्या मांडीवर झोपले.

शल्य : नंतर काय झाले?

कर्ण : नंतर....

दुर्दैवाने वज्रमुख नावाचा किडा माझ्या मांड्यांना चावला.(परंतु) झोपलेल्या गुरूंचा निद्रा भंग होईल, या भीतीने मी ती वेदना धैर्यपूर्वक सहन केली. ते रक्ताने माखून तसेच त्यांचा क्रोधाग्नी भडकला आणि क्रुद्ध होऊन त्यांनी मला शाप दिला की युद्धकाळात तुझे अस्त्र निष्फळ होवो.।।१०।।

शल्य : अरेरे. फारच दुःखाची गोष्ट त्यांनी म्हटली.

कर्ण : तर आता मी माझ्या अस्त्रांच्या गोष्टींची परीक्षा करतो तसे करतो.

अरे हे अस्त्रसुद्धा निष्फळ झाल्यासारखे दिसतात आणि हे दीन भावाना विवश झालेले घोडे आपले डोळे बंद करून वारंवार ठेवकाळत आहेत स्खलित होता. हे सप्तछदाप्रमाणे मदाच्या सुगंधाने युक्त उन्मत्त हत्ती सुद्धा जणू काही रडत भूमीतून परत चलण्याचे निवेदन करीत आहेत शंख आणि दुंदूभीसुद्धा निशब्द झाली आहे.।।११।।

शल्य : अरे अरे! फारच कष्टदायक........(घडले)

कर्ण : शल्यराज दुःख करू नकोस.

युद्धात मृत्यू आल्यास स्वर्गप्राप्ती होते आणि जिंकल्यावर यश मिळते. तेव्हा जगात दोन्ही सन्माननीय आहे. युद्धात निष्फळता नाही।।१२।।

आणि

युद्धात आशा ठेवणारे गरूडाप्रमाणे वेगवान शोभा युक्त सुंदर काबुली वंशातील हे घोडे त्यांची रक्षामी करायला हवी(ते) माझी रक्षा करोत.

आणि

गाई ब्राह्मणांचे कल्याण होवो. पतीव्रतांचे कल्याण होवो. रणात दाखवणाऱ्या वीर योद्ध्यांचे कल्याण होवो. मला मिळालेल्या योग्य वेळेचे कल्याण होवो. मी आता प्रसन्न आहे.

पांडवांच्या अत्यंत दुर्बोध असलेल्या युद्ध क्षेत्रात प्रवेश करून अत्यंत प्रसिद्ध प्रतिथयश अशा धर्मराजाला बांधून आपल्या तीव्र बाणांनी अर्जुनाला पाडून (मारून) (त्या) (दुर्गम अशा पांडवांच्या सैन्यात) भयानक सिंह मेल्यानंतर सुगम अश्या जंगलामध्ये मी प्रवेश करीन।।१४।।

शल्यराजा तर आपण रथावर आरूढ होऊ या

शल्य : ठीक आहे.

(दोघेही रथावर चढण्याचा अभिनय करतात)

कर्ण : शल्यराज जिथे तो अर्जुन आहे. तेथेच ने.

(पडद्यात)

अरे कर्णा! मी खूप मोठी भिक्षा मागतो. मला खूप मोठी भिक्षा हवी आहे.

कर्ण : (ऐकून) अरे, हे तर खूप तेजस्वी शब्द आहेत.

हा कोणी सामान्य ब्राम्हण नसून एखादा श्रीमंत व्यक्ती आहे. ज्याचा गंभीर आवाज ऐकून त्याच्या प्रभावाने चालणारे माझे घोडे कान उंच करून पापणी न हलवता मान तिरकी करून त्याच्याकडे बघत एकाएकी थांबले जणु चित्रात काढल्याप्रमाणे आणि त्यांच्या आपल्या शरीरावर ताबा राहिला नाही. या ब्राह्मणाला बोलाव. नाही नाही मीच श्रीमान इकडे यावे. (तेव्हा ब्राम्हण वेशात इंद्र प्रवेश करतो)

शक्र : हे मेघासूर्यासोबत तुम्ही जा सगळे कर्णाच्या जवळ जाऊन हे कर्णा मला मोठी भिक्षा दे.

कर्ण : हे भगवान! मी प्रसन्न झालो अनेक पराक्रमी राजांच्या मणीमय मुकुटाने ज्याचे चरणकमल सुशोभित होतात तो कर्ण आज श्रेष्ठ अशा ब्राह्मणाच्या चरणा वरील धुळीने पवित्र मस्तक असलेला होऊन या जगात कृतार्थ होऊन तुम्हाला नमस्कार करतो

शक्र : (स्वगत) मी आता काय करावे? मी आता काय बोलावे? जर दीर्घायुषी हो असे म्हटले तर चिरंजीवी होईल. आणि जर असे म्हटले नाही तर तो मला मूर्ख समजेल. तेव्हा दोन्ही सोडून मी काय बोलावं? किंवा हे ठीक आहे. (मोठ्याने) हे कर्ण! सूर्य, चंद्र, हिमवान आणि सागराप्रमाणे तुला यश प्राप्त होवो.

कर्ण : भगवान दीर्घायुषी हो असे का म्हटले नाहीत. किंवा हे सुद्धा अतिशय सुंदर आहे. कारण केवळ धर्मच यत्नाद्वारे मनुष्याकडून साध्य केला जातो. राजलक्ष्मी तर सापाच्या जिभेप्रमाणे चंचल आहे म्हणून प्रजेचा पालन करणारा मृत्यूनंतरही केवळ कीर्तीने जिवंत राहतो. भगवान काय हवे? मी काय देऊ?

शक्र : मला खूप मोठी भिक्षा हवी आहे.

कर्ण : तुम्हाला खूप मोठी शिक्षा देईल. माझे ऐश्वर्य ऐका,

हे ब्राह्मण जर तुला आवडत असेल तर मी धनधान्यासोबत हजार गाई देऊ शकतो. ज्यांच्या वरचा भाग सुवर्ण मंडित आहे ज्या स्वस्थ आणि तरुण आहेत आणि अमृताप्रमाणे दुधाच्या धारा देणाऱ्या तसेच वासरांसोबत सन्तुष्ट आहेत.

शक्र : एक हजार गाई काही काळापर्यंतच दूध प्राशन करेन. कर्ण, नकोत. मला गायी नकोत.

कर्ण : काय आपल्याला नको? हे सुद्धा ऐका.

सूर्याच्या घोड्याप्रमाणे असलेले राजलक्ष्मी चे साधन असलेले अनेक राजांनी ज्यांची प्रशंसा केली आहे. असे उत्तम काबुली वंशातले अद्भुत गुणांनी युक्त वाऱ्याप्रमाणे वेग असलेले, तसेच युद्धामध्ये ज्यांचा पराक्रम बघितला आहे, असे हजार घोडे मी ताबडतोब देतो.

शक्र : घोडे !! काही काळ पर्यंतच अश्वारोहण करेन. नको कर्ण मला घोडे नको.

कर्ण : काय आपल्याला नको? ठीक आहे. दुसरी ऐका, ज्यांच्या कपोलांवरून मदांच्या नद्या वाहतात आणि ज्यावर भ्रमर गुंजारव करतात, पर्वताप्रमाणे यांची शोभा आहे. मेघाप्रमाणे गंभीर ज्यांचा आवाज आहे, शुभ्र नखे व दात असणारे युद्धात शत्रूंचा नायनाट करणाऱ्या अनेक हत्तींचे कळप तुम्हाला देतो.

शक्र : हत्ती ! थोडा वेळच चढाई करेन. कर्ण मला हत्ती नको.

कर्ण : काय आपल्याला हेही नकोत? अजून ऐका, अमर्याद सोने देतो.

शक्र : घेऊन जातो (किंचित जाऊन) नाही. कर्ण मला हेही नको.

कर्ण : तर मग पृथ्वी जिंकून देऊ?

चक्र : पृथ्वी घेऊन मी काय करू?

कर्ण : तर मग अग्निष्टोम यज्ञाचे फळ देतो.

शक्र : अग्निष्टोम यज्ञाच्या फळाचं काय करू?

कर्ण : तर मग माझं मस्तक देतो.

शक्र : देवा रक्षा करो रक्षा करो.

कर्ण : घाबरू नका. घाबरू नका. आपण प्रसन्न व्हावे इतर ऐका.

माझ्या शरीरा सोबतच देह रक्षा करण्यासाठी हजारो अस्त्र आणि देवता तसेच दानवांना देखील अभेद्य असे हे कवच आहे. जर तुम्हाला ते आवडत असेल तर मी आनंदाने आपल्या कवचा सोबत कुंडले ही देईन.

शक्र : (प्रसन्नतेने) द्या द्या

कर्ण : अच्छा, हा त्याचा स्वार्थ होता. नक्कीच हे त्या कपट्याचे कारस्थान म्हणजे श्रीकृष्णाचा उपाय!! ठीक आहे. ते सुद्धा होवो. माझा धिक्कार असो. मी योग्य विचार केला. येथे काही संशय नाही. (उघडपणे) घ्या....

शल्य : अंगराज! देऊ नका. देऊ नका.

कर्ण : शल्य, आता रडू नकोस बघ.

कालांतराने विद्या नष्ट होते. मजबूत मुळे असणारी झाडे देखील पडतात पाणीसुद्धा तळ्यातून सरोवरात जाते. परंतु होम केलेला पदार्थ आणि केलेले दान जसेच्या तसे राहते. म्हणजे पुण्याचा नाश होत नाही तेव्हा हे आपण घ्यावे

शक्र : (घेऊन) अरे मी हे घेतले पूर्वी मी अर्जुनाच्या विजयासाठी सगळ्या देवतांन सोबत जी प्रतिज्ञा केली होती. ती आज मी पूर्ण केली तेव्हा मी आता ऐरावतावर पडून कर्ण आणि अर्जुनाचे युद्ध बघतो. असे म्हणून निघून जातो.

शल्य : अंगराज, तुम्ही फसवला गेलात.

कर्ण : कोणाकडून?

शल्य : इंद्राकडून.

कर्ण : नाही. नाही. खरोखर नाही. इंद्रच माझ्याकडून फसवला गेला. कारण,

ब्राह्मणांकडून केल्या जाणाऱ्या अनेक यज्ञांच्या फळांनी तृप्त झालेला दानवांच्या समूहाचा विनाशक मुकुट धारण करणारा आणि ऐरावताला थोपटल्याने कणखर कठोर बोटे असलेला इंद्र माझ्याकडून उपकृत झाला.

(ब्राह्मण रुपात प्रवेश)

देवदूत : हे कर्ण! कवच आणि कुंडले घेतल्यानंतर पश्चात्ताप झाल्याने इंद्राकडून तू उपकृत झाला आहेस. पांडवांमध्ये एका पुरुषाचा वध करण्यासाठी ही विमला नावाची शक्ती घे.

कर्ण : धिक्कार असो, दानाचा मोबदला घेत नसतात.

देवदूत : खरोखर ब्राह्मणाने म्हटल्यामुळे तू हे घ्यायला हवं.

कर्ण : ब्राह्मणाचे वचन मी पूर्वी कधीच टाळले नाही केव्हा मिळेल शक्ती?

देवदूत : जेव्हा स्मरण करशील तेव्हा मिळेल.

कर्ण : ठीक आहे. मी अनुगृहीत झालो. आपण यावे आता.

देवदूत : छान. जातो.

कर्ण : शल्यराज. तोपर्यंत रथावर चढाव.

शल्य : ठीक आहे. रथावर चढण्याचा अभिनय करतो.

कर्ण : आवाज ऐकू येत आहे. हे काय आहे बरं?

प्रलयकालीन समुद्राप्रमाणे अत्यंत गंभीर आवाज असलेला हा श्रीकृष्णाचा शंख आहे की अर्जुनाचा? युधिष्ठीराच्या अपयशाने क्रोधित झालेला अर्जुन माझ्याशी नक्कीच युद्ध करेल शल्य! जेथे तो अर्जुन आहे तेथेच माझा रथ घेऊन चल.

शल्य : ठीक आहे.

भरतवाक्य

सगळीकडे संपत्ती असो संकटांचा नेहमी नाश होवो आणि आमच्या ह्या पृथ्वीवर राजाच्या गुणांनी युक्त असलेला योग्य राजा शासन करो.

२.८ चरित्र–चित्रण

कर्ण – प्रस्तुत नाटकातील नायक कर्ण एक सहृदय, शूर आणि दानी निर्वाह करण्यासाठी पुढे ठाकतो तिथेच दुसरीकडे त्याच्या समोर अनेक बाधा व निराशा उपस्थित होतात. यांमुळे त्याचा उत्साह क्षीण होतो. शारीरिक बसाने निश्चितच तो निर्बल नाही. पण पांडवांवर तो अस्त्रप्रयोग कसा करणार? त्याच्या गुरु परशुरामाने त्याला आधीच शाप दिलेला आहे की, वेळ पडल्यावर त्याचे अस्त्र व्यर्थ होईल. तो शल्याला आपला रथ तिथे घेऊन जाण्यास सांगतो जिथे अर्जुन आहे पण त्याच्या लक्षात आहे की ब्राह्मणाचा शाप व्यथ होणार नाही. युद्धक्षेत्रामध्ये त्याच्या रथाचे चाक पृथ्वीमध्ये कसून त्याच्या मृत्यूचे कारण बनेल. (यद्यपि नाटकात या घटनेचा उल्लेख नाही परंतु ब्राह्मणशापाचा संकेत आहे). या सर्व समस्या एकाच वेळी कर्णासमोर येतात. तो वीर क्षत्रिय आहे. युद्धप्रसंगी अशाप्रकारचा भाव सर्वथा घातक व अस्वाभाविक आहे. परंतु तो आपल्या भाग्यपंक्तिला मिटवू शकत नाही. आपल्या इच्छापूर्तीसाठी त्याच्यामध्ये अभंग उत्साह आहे. त्यासाठी तो पुन्हा पुन्हा रथाला चालवण्यासाठी सांगतो पण सफल होत नाही. रथावर चढणार त्यापूर्वीच एक ब्राह्मणभिक्षुक आपल्या ओजपूर्ण व दृढस्वरांमध्ये त्याला पुढे जाण्यापासून थांबवतो. त्याच्या मनामध्ये ब्राह्मण, गौ, धर्मांप्रति मोठी आस्था आहे. तो (संभवतः रथातून उतरून) ब्राह्मणाला आपली अभिलाषा विचारतो तो सर्वप्रकाराने ब्राह्मणाला संतुष्ट करणे आपले परमकर्तव्य समजतो. यद्यापि कर्ण त्या ब्राह्मणाच्या दृढ व्यापक व प्रभावी वाणीमुळे तो थोडा शंकित होतो. पण ज्याने आपल्या जीवनामध्ये त्यागापेक्षा महान अशी कुठलीच वस्तु नाही मानली त्या कर्णाला ब्राह्मणाला देण्यासाठी कुठलीच आदेय वस्तु वाटत नाही. म्हणून निःशंक होऊन तो त्या प्राकृतभाषी विचित्र ब्राह्मणाला क्रमशः गाय, घोडे, हत्ती, अग्निष्टोमयागाचे फळ, अनंतपृथ्वी, धन आणि शेवटी आपले मस्तकही

देण्यासाठी तो तत्पर होतो. कर्णाची दानवीरता त्यावेळी आपल्या चरमसीमेवर पोहोचते ज्यावेळी तो आपल्या स्वाभाविक अंगत्राण कवचकुंडलही ब्राह्मणाच्या रुचिनुसार स्वतःदेण्यासाठी तयार होतो. यद्यापि ब्राह्मणाच्या प्रसन्नतेमुळे त्याला पूर्ण षड्यंत्राचा पत्ता लागतो. तरीसुद्धा त्याच्या मनामध्ये क्षुद्रता किंचितही येत नाही. तो शल्याद्वारे विरोध केल्यानंतरही तो कवचकुंडले काढून देऊन देतो. कर्णाला भारतीय आदर्श आणि संस्कृतिप्रति अगध श्रद्धा आहे, तो राजपुरुष आहे आणि सोबतच एक वीर योद्धाही. तो जाणतो कि राजाचे परमकर्तव्य आहे कि, प्रजेचे सर्वप्रकारे पालन करावे शरीर विनाशधर्मी आहे. काही शाश्वत आहे तर ते त्याचे यश. याची पुष्टि तो वचनमात्रानेच नव्हे तर क्रियात्मकरूपानेही करतो. संकटापन्न कर्ण आपल्या कवचकुंडलाला सर्वस्व समजत असतानाही ब्राह्मणाला तो यासाठी देतो कारण तो दान करीत आहे जी शाश्वत वस्तु आहे. भानवसुलभ दयेची भावनाही त्याच्यात विद्यमान आहे. म्हणून तो म्हणतो कि, ‘जरी’ मी राधेय नावाने विख्यात आहे. परंतु पुत्र तर मी कुंतीचाच. त्यामुळे युधिष्ठिरादि माझे लहान भावंडे धर्मानुसार माझ्या मुलांसारखेच आहेत अतः त्यांच्यावर शस्त्राने प्रहार कसे करु. शेवटी ज्यावेळी इंद्रचा देवदूत कर्णाला कवचकुंडलाच्या मोबदल्यात दैवीशक्ती संपन्न ‘विमला’ ग्रहण करण्यास सांगतो तेव्हा कर्ण स्पष्टपणे अस्वीकार करतो. ही आहे भरतीय त्यागाची पराकाष्ठा ज्याचे चरम निदर्शन कर्णाद्वारे होते. शेवटी आपण पाहतो कि, कर्ण ब्राह्मणवचनाचा आदर राखण्यासाठी दैवीशक्तीचे आशीर्वाद रुपाने ग्रहण करतो. नाटकाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत कर्ण एक कर्तव्यापालक वीर क्षत्रियाच्या रुपात चित्रित होतो. कर्णाचे जसे चरित्र महाकवीने उपस्थित केलेले आहे ते सर्वथा भारतीय गौरव व त्यागाचे प्रतिनिधित्व करते.

शल्यराज –

संपूर्ण नाटकावर कर्णाच्या व्यक्तित्वाचा एवढा प्रभाव बनला कर्णाच्या चरित्राला उभारण्यासाठी एक माध्यम मात्र आहे. तो कर्णाच्या प्रत्येक अनुभूतिने प्रभावित होऊन पूर्ण सहानुभूति प्रदर्शित करतो. महाभारताच्या शल्यामध्ये ही गोष्ट नाही. तो क्रुर, निर्दयी तसेच विश्वासघाती आहे. याउलट भासाचा शल्य मानवतावादी आहे. जिथे दुःखद घटनेचे वर्णन होते तिथे तो स्वतः कष्टाचा अनुभव करतो. अशाप्रकारे एकंदरीत हे स्पष्ट होते कि, शल्य कर्णाप्रमाणे एकाच भावधारेच्या तरंगाचे घात-प्रतिघात सहन करित वाहत चालला आहे. जेथे कर्ण इंद्राला एक ब्राह्मण समजून आपल्या रक्षणाचे एकमात्र साधनभूत कवचकुंडले देऊ लागतो तेथे शल्याचे शुभचिनृकरुप प्रस्फुटित होते आणि तो कर्णाला दान देण्यापासून रोखतो. शेवटी तो म्हणतो, ‘हे अंगराज! तुम्ही निश्चितच फसवल्या गेले आहात.’ हे वाक्यच त्याच्या मानसिक व्यथा, निर्भल हृदय आणि कर्णाप्रति अपार सहानुभूति व्यक्त करते. सर्व प्रकारे तो कर्णाच्या सुख सुविधेचे चिंतन करत शेवटपर्यंत तो त्याच्या सहृदय सारख्याप्रमाणे बनून राहतो.

इंद्र –

इंद्राच्या चरित्राची क्षणिक परंतु गंभीर झलक या नाटकामध्ये दिसते. तो आपल्या पक्षाची (देव, कृष्णाच्या पक्षाची) विजय कोणत्याही परिस्थितीमध्ये इच्छित असतो. त्याची पूर्ति शेवटी आपल्या कपटपूर्ण व्यवहाराने करतो. या एका कार्याने इंद्राच्या पूर्ण जीवनाचे समग्र चित्र उपस्थित केले आहे. इंद्रामध्ये स्वार्थसिद्धि व पक्षपाताची भावना किती दृढ आहे हे स्पष्ट होते. शेवटी त्याचे ते रूपसुद्धा समोर येते जिथे त्याला त्याच्या कपटपूर्ण व्यवहाराने ग्लानि येते. हाच मानवतेचा निकष आहे. याच भावाने प्रेरित होऊन कर्णाजवळ देवदूत पाळवून त्याला ‘विमला’ नावाची शक्ती प्रदान कतरे. स्वार्थसाधक इंद्राचे भारतीय परंपरायुक्त रुप येथे प्राप्त होते.

२.९ कर्णभाराच्या शीर्षकाचे महत्त्व

प्रस्तुत एकांकीचे नाव ‘कर्णभारम्’ आहे. शीर्षकावर विचार करताना दोन शब्द स्पष्ट समोर येतात, पहिला ‘कर्ण’ आणि दुसरा ‘भारम्’. कर्णाचे दोन अर्थ होतात. कौरवसेनापती आणि कर्णेन्द्रिय. त्याचप्रमाणे भाराचेही अनेक अर्थ विद्वानांनी केले आहेत.

डॉ. जी.के. भट्ट यांच्यानुसार कर्णाची मानसिक चिंता भारस्वरूप होऊन त्याला कष्ट देते. या विषयवस्तुला डोळ्यासमोर ठेवून या नाटकाला उक्त शीर्षक ठेवल्या गेले आहे. वास्तविकपणे ‘भार’ शब्द मोठा व्यापक व

अनेकार्थी आहे या कारणास्तव आलोचकानां या नाटकावर अनेक दृष्टिकोनातून विचार करण्यास बाध्य व्हावे लागले. 'भार' शब्दाचा सामान्य अर्थ 'ओझे' हे कोणत्याही प्रकारे सोडता येत नाही. कर्णासाठी सर्वात मोठा भार त्याचे उत्तरदायित्व आहे जे अनेक बाधांसहित तो एका ओझ्याप्रमाणे वहन करतो.

स्वतः भीष्मपितामहांनी महाभारताच्या युद्धाच्या सुरूवातीला कौरवीय सेनासञ्चालनाचे महान् उत्तरदायित्व ग्रहण केले तेवहा स्वतः म्हटले होते, 'समुद्यतोऽयं भारो मे सुमहान् सागरोपमः (उद्योग १६८/३०)' या आधारावर म.भ. गणपती शास्त्री यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले कि यांत कर्णाचे सेनापतीरुप प्रभावी ठरत नाही. जर आणखी एक अंक वाढवला तर कर्णाचे चरित्र पूर्ण झाले असते व त्याच्या गंभीर उत्तरदायित्वाची झलक स्पष्ट झाली असती. जिथे साहित्यिक सौंदर्य आणि विषयवस्तुच्या योग्य निर्वाहाचा प्रश्न आहे तिथे हे नाटक स्वतःमध्ये पूर्ण आहे. यांत कोणत्याही प्रकारची प्रभावमयता व सोद्देश्यतेची कमतरता दिसून येत नाही म्हणून आणखी एक अंक वाढविण्याची गोष्ट परत नाही. ज्या धैर्य आणि अपूर्ण साहसाने कर्ण अनेक अडचणींचा सामना करत आपल्या लक्ष्याच्या पूर्तीचा प्रयत्न करतो त्यातच त्याच्या सैन्यसंचालनाची सफल अभिव्यंजना होवुन जाते.

डॉ. पुशलकर यांनी वाटकला स्वतःमध्ये पूर्ण मानून त्याची–त्याच्या शीर्षकाची व्याख्या अशाप्रकारे केली आहे. 'कानासाठी भारस्वरूप झालेल्या कुंडलाला पाहुन कर्णाद्वारे अद्भुत दानशूरता प्रकट केल्या गेली आहे. त्यालाच केंद्रबिंदू मानून हे नाटक लिहल्या गेले आहे.' आपल्या कथनाच्या पुष्टिमध्ये त्यांनी लिहले की, 'वाचिकदान आणि वास्तविक (क्रियात्मक) दान यांच्या मध्ये जो काळ गेला त्यामध्ये ते कुंडल कर्णाला भाराप्रमाणे वाटत होते. आपल्याया मताची व्याख्या करताना पुढे लिहतात कि, कर्णाची निःस्वार्थता, उदारह्रदयता आणि उच्चाशयता इतक्या उंच पातळीवर गेली कि ज्यावेळी त्याने आपल्या मुलातून कुंडले दान देण्याचे वचन दिले त्याच क्षणी ते दुसऱ्याचे प्रतीत होऊन कर्णासाठी भारस्वरूप होऊन गेले.'

प्रा. सी.आर. देवधर यांना ही व्याख्या अपूर्ण वाटते. त्याच्या मते ही व्याख्या विषयवस्तुचे पूर्ण उद्घाटन करीत नाही. कारण यांत कवचाचा उल्लेख नाही. कर्णाच्या रक्षेसाठी कुंडलापेक्षा कवचाचे महत्त्व स्पष्ट स्वीकारल्या जाऊ शकते. डॉ. मॅक्स लिंडेन्यू यांनी भार शब्दाचा अनुवाद करताना कवच असा अर्थ घेतला आहे. एका महोदयांनी तर या नाटकाचा पर्याय कवचांक असा दिला आहे. कर्णभारा व्यतिरिक्त 'भार' शब्दाचा अर्थ कवच असा अर्थ ग्रहण केल्या गेला नाही. डॉ. विंलटरनित्ज यांनी कर्णभारच्या व्याख्येमध्ये कर्णाच्या कठीण कार्याचा संकेत केला आहे. जसे कर्णाचे हे वचननिर्वाह कि तो ब्राह्मणाला कोणत्याच गोष्टीसाठी असंतुष्ट राहू देणार नाही.

प्रा. जी.सी. झाला यांनी आपल्या निबंधामध्ये स्पष्ट केले आहे कि पंचरात्रचा कर्ण आणि भारार्थम् हे महत्त्वपूर्ण शब्द आहेत. (जर द्रोणाचार्यद्वारा हे वाक्य म्हटल्या गेले नाही तर) तरी सुद्धा ही केवळ सामान्य उक्ती नाही, तर जसे कवीने कर्णभारची व्याख्या प्रसंग प्राप्त स्वतःच केली आहे. प्रा. झाला यांचा अनुमान आहे कि, पंचरात्रच्या रचनेवेळी त्यांना कर्णभारच्या अनेकार्थाचे पूर्ण ध्यान असावे. जसे कर्णभारमध्ये कर्ण युद्धासाठी प्रस्थान करतो तसेच पंचरात्रातही करतो. पंचरात्रामध्ये तो रथ मागवतो तर कर्णभारमध्ये तो स्वतः रथाजवळ जातो. अशाप्रकारे 'कर्णभारम्' शीर्षक स्पष्ट होते की कवीला यांतून कर्णाचे प्रस्थान द्योतित करणे अभीष्ट आहे. आता शंका उठते कि हे प्रस्थान कशासाठी? श्री उलनर महोदयांचे कथन आहे कि प्रस्तुत एकांकी दुःखांत आहे व याचे ध्येय कर्णाचा दुःखांतही होऊ शकतो किंवा कर्णाचे मृत्युजवळ प्रस्थानही होऊ शकते. याची प्रतिची कर्णाचे तीन–तीन वेळा शल्यासा रथ प्रेरित करण्यासाठी सांगण्यातून होऊन जाते. स्पष्ट आहे कि कर्ण प्रत्येकक्षणी त्याच्या मृत्यु म्हणजेच अर्जुनाकडे जाण्यासाठी उद्यत आहे.

२.१० अपेक्षित प्रश्न संच

दीर्घोत्तरी प्रश्न

१) कर्णभारानुसार भासाच्या शैलींचे विवेचन करा.

२) कर्णभाराचा सारांश लिहा

३) महाभारतातील कर्णभाराचे मूळ कथानक लिहून भासकवीने केलेले कर्णाचचरित्राचित्राण सविस्तर लिहा.

४) कर्णभाराचे कथानक स्वत:च्या शब्दात सांगा

५) 'कर्णभाराचा' काव्यप्रकार लिहून त्यातील वैशिष्टे लिहा

६) कवी भासाविषयी सविस्तर लिहा

टीपा

१) कर्णाचे औदार्य

२) भासनाटकचक्र

३) कर्णभाराचे महत्व

४) शल्य

५) भासकवी शैली

६) इन्द्र

७) संस्कृतवाङ्मयात कर्णभाराचे स्थान

२.११ संदर्भ ग्रंथ सूची

१. कर्णभारम् - श्रीरामजी मिश्र, चौखंबा, विद्याभवन, वाराणसी.

२. भासनाटकचक्रम् - आचार्य बलदेव उपाध्याय, चौखंबा, विद्याभवन, वाराणसी.

३ संस्कृतनिबन्धाः

३.१ प्रस्तावना :–

संस्कृतभाषेच्या सामान्य परिचयाच्या दृष्टीने आणि संस्कृतभाषेत वाक्यरचना करता यावी म्हणून हा भाग विशेषत्वाने अभ्यासण्यासारखा आहे. योगदर्शनातील मूलभूतग्रंथ संस्कृत भाषेत असल्याने या भाषेचा प्राथमिक परिचय होणे महत्वाचे आहे. म्हणून रामायणादि महाकाव्ये अथवा देशभक्ति सारखे विषय कमीतकमी शद्बांत आणि जास्तीत जास्त आशायासह कसे लिहिता येवू शकतात याचा नमूना येथे देण्यात आला आहे. अशा प्रकारच्या सर्व विषयांना अत्यंत आलंकारिक भाषेतही मांडता येवू शकत असले तरीही या क्षेत्रात नव्याने अभ्यास करण्यास उत्सुक असणाऱ्या जिज्ञासूंसाठी येथे काही निबंधाचे विषय तयार करून दिले आहेत.

३.२ उद्देश :–

१) संस्कृतभाषेत वाक्यरचना करण्याचे कौशल्य प्राप्त करणे.
२) संस्कृतभाषेत निबंधरचना करण्याचे कौशल्य प्राप्त करणे.
३) संस्कृतभाषेत थोडक्यात आणि मुद्देसूद वाक्यरचना करण्याचे कौशल्य प्राप्त करणे.

३.३ भारतीयसंस्कृतेः महत्त्वम्

संस्कृतिः मानवसमाजस्य अतिप्राचीन–अमूल्यनिधिः अस्ति। मानवः स्वयंस्कृत्या एव सृष्ट्याः सर्वोत्तमः प्राणी कथ्यते।

सम्यक् कृतिः संस्कृतिः कथ्यते। या मनसः आत्मनो वा संस्कारं करोति सा संस्कृतिः संस्कृतिः मानवान्तः करणस्य अज्ञानं दुरीकरोति, ज्ञानलोकं प्रकाशयति।

भारतीयानाम् अतीतकालाद् वर्तमानपर्यन्तं परम्परागतसंस्काराणाम् अभिधानमेव भारतीयासंस्कृतिः।

इत्थं संस्कृति अस्मिन् जगतीतले प्राचीनतमा विद्यते। अस्याः प्राचीनयाः घोषणा प्राचीनतमे ग्रन्थे वेदेऽपि कृता वर्तते ''सा प्रथमा संस्कृतिः विश्ववारा'' इति।

आध्यात्मिकी भावना भारतीयसंस्कृतेः प्रथमा विशेषता। आध्यात्मिकतायाः परिणामस्वरूपं हि अस्मत् संस्कृतौ प्राणिमात्रं प्रति समानतायाः भावना दृश्यते।

भारतीयासंस्कृतिः जीवनस्य सर्वेषु क्षेत्रेषु धर्मस्य प्राधान्यं स्वीकरोति। अस्मात् कारणाद् आशावादस्य अपि प्रबलता दृश्यते।

कर्मपुनर्जन्मनोः सिद्धान्ते दृढः विश्वासः भारतीयसंस्कृतेः महती विशेषता। मानवः स्वकर्मानुसारम् एव फलं प्राप्नोति।

अतिथिसेवा स्नेहः, दया, परोपकारपरायणता, अहिंसा, आत्मविश्वास; मातृपितृगुरुजन भावनानामपि भारतीयसंस्कृतौ गरिष्ठं महत्त्वम् अनुभूयते।

सदाचारस्य महत्त्वमपि अप्रतिमं खलु।

धनहीनो हीनः न कथ्यते परन्तु चरित्रहीनः हीनो भवति।
अत एव मानवस्य समाजस्य राष्ट्रस्य वा विकासाय भारतीयसंस्कृतेः अतीव महत्त्वम् अस्ति।

३.४ महाकाव्यानि

'महाकाव्यम्' इति एकः पारिभाषिकः शब्दो वर्तते। साहित्यदर्पणे आचार्यविश्वनाथेन अस्य लक्षणं एवं कृतम्–

सर्गबन्धो महाकाव्यं तत्रैको नायकः सुरः।
सद्वंशः क्षत्रियो वापि धीरोदात्तगुणान्वितः।।
अर्थाद् महाकाव्ये संर्गानां निबन्धं भवेत्।
महाकाव्ये दैवता अथवा सद्वंशः क्षत्रियो नायकः
भवति सः धीरोदात्तत्वादिगुणैः युक्तो भवति।
संस्कृत साहित्ये महाकाव्यानि प्रमुखानि सन्ति

१) रघुवंशमहाकाव्यम् – कालिदासस्य कृतित्वेन प्रसिद्धं रघुवशमहाकाव्यं यत्र १९ सर्गाः सन्ति। रघुः अत्यन्तं पराक्रमी दानशूरः राजा आसीत्। तस्य वंशीयानां गुणवर्णनम् अस्मिन् महाकाव्ये अस्ति अतः कविकालिदासः महाकाव्यस्यास्य रघुवंशम् इति नाम अकरोत्।

२) कुमारसम्भवमहाकाव्यम् – कालिदास्य अपरं महाकाव्यम् इदम्। शिवपावर्तत्योः प्रेम्णः वर्णन पुरस्सरं देवसेनापतेः स्कन्धस्य कुमारस्य जन्मवर्णनयुक्तम् अपूर्वम् इदं महाकाव्यम्।
इदमपि महाकाव्यं सप्तदशसर्गात्मकमस्ति।

३) किरातार्जुनीयमहाकाव्यम् – किरातार्जुनीयं महाकाविना रचितम् एकं महाकाव्यम् अस्ति। किरातार्जुनीयस्य कथानकस्य मुलाधारो महाभारतम् अस्ति। अस्मिन् महाकाव्ये षोडशसर्गाः सन्ति।

४) शिशुपालवधमहाकाव्यम् – महाकविमाघेन विंशतिः सर्गात्मके स्वीये ''शिशुपालवधम्'' इति महाकाव्ये नामके सर्वेषामेव रसानां प्रतिपादनं कृतम्। महाभारतस्य सभापर्वणि ३३ अध्यायतः ४५ पर्यतं त्रयोदशसु अध्यायेषु शिशुपालवधस्य कथा उपलभ्यते।

५) नैषधीयचरितमहाकाव्यम् – महाकविना श्रीहर्षेण ''नैषधीयचरितम्'' इति, महाकाव्यस्य रचना कृता। अस्मिन् महाकाव्ये २२ सर्गाः सन्ति। अस्मिन् निषधराजः नलः विदर्भस्य राजकन्या दमयन्ती इत्यनयोः विवाहः, नलस्य राज्यशासनञ्च इत्यादयः विषयाः चातुर्येण वर्णिताः सन्ति।

३.५ पर्यावरणम्

अस्मान् परितः यानि पञ्चमहाभूतानि सन्ति तेषां समवाय एव ''पर्यावरणम्'' इति पदेन व्यवह्नीयते। मनुष्यो यत्र निवसति, यत् खादति, यत् वस्त्रं धरति, यज्जलं पिबति, यस्य पवनस्य सेवनं करोति, तत्सर्व पर्यावरणम् इति। सम्प्रति ''पर्यावरणम्'' इति ज्वलन्तः विषयः वर्तते परन्तु जनेषु तथा जागरूकता न दृश्यते यादृशी जागरूकता अपेक्षिता वर्तते इति।

पर्यावरणस्य साक्षात् सम्बन्धः प्रकृत्या सह भवति। वस्तुतः अस्माकं परिवेशे वयं विविधजीवजन्तून् विविधवल्लीवृक्षात् अन्यसजीवनिर्जीववस्तूनि च पश्यामः एते सर्वेऽपि मिलित्वा एव पर्यावरणस्य रचनां कुर्वन्ति। पर्यावरणप्रदुषणस्य समस्या मानवद्वारा विविधसंसाधनानाम् उपयोगे इतोऽपि वर्धिता भवति। वस्तुतः पर्यावरणसंरक्षणे वृक्षाणाम् अतीव महत्त्वं स्थानं च वर्तते, परन्तु सम्प्रति मनुष्यःच स्वलाभार्थं प्रतिदिनं वृक्षाणां कर्तने निम वर्तते। वृक्षायुर्वेदे – उच्यते –

दशकुपसमा वापी दशवापीसमो ह्रदः।
दशह्रद्मः पुत्रो दशपुत्रं समो वृक्षः।

अर्थात् वापी दशकूपसमा अस्ति, ह्रद् दशवापीसमः भवति, पुत्रः दशह्रद्मः भवति, तथा च वृक्षः तु दशपुत्रसमः भवति। अतः जीवने यावत् शक्यं तावत् जलप्रदुषणं, वायुप्रदुषणं, ध्वनिप्रदुषणं मृदाप्रदुषणञ्च अकृत्वा पर्यावरणस्य रक्षा करणीया येन मनुष्यः, समाजः, राष्ट्रम्, सम्पूर्णसंसारः च सुखी भवेत् ।

३.६ शिक्षा – आयोगा :

स्वतन्त्रताप्राप्तेः परं भारतसर्वकारः भारतीयशिक्षां सुनियोजियितुं, सुसङ्घटयितुं, सुविकासयितुं च दृढसंकल्पम् अकरोत्। तदनन्तरं भारतसर्वकारेण शिक्षाप्रणाल्याः सर्वेक्षणाय परामर्शप्रदानायोगः निर्मितः। तेषु

१. विश्वविद्यालय – आयोगः।

२. माध्यमिकशिक्षा – आयोगः।

३. प्राथमिकशिक्षा – आयोगः।

४. संस्कृतशिक्षा – आयोगः।

१) विश्वविद्यालय – आयोग :

१९४८ तमे वर्षे नवम्बरमासस्य चतुर्थे दिनांके अस्य आयोगस्य अध्यक्ष : डॉ. सर्वपल्ली राधाकृषणन्महाभागा अभवन्। विश्वविद्यालयशिक्षा व्यावसायिक – वाणिज्य – राजनीति – क्षेत्रेषु विकासाय स्यात् इति अस्य आयोगस्य प्रमुखम् उदेश्यम् आसीत्।

२) माध्यमिकशिक्षा – आयोग :

भारतसर्वकारेण २३/०९/१९९५ तमेऽब्देवर्षे मद्रासविश्यविद्यालयस्य उपकुलपतीना डॉ. आकार्टलक्षणस्वामिमुदलियारमहाशयानाम् आध्यक्षे माध्यमिकशिक्षायाः नवीनीकरणम्, पाठयक्रमः, पाठ्यपुस्तकानि, छात्राणां शारीरिकम् उच्चारणम् इत्यादयो विषयाः अस्मिन् आयोगे चिन्तितः।

३) प्राथमिकशिक्षा – आयोग :

१९६४ तमे वर्षे जुलाईमासस्य १४ दिनाङ्के प्रो. डी.एस. कोठारीमहोदयस्य नेतृत्वे अस्य आयोगस्य निर्माणं. जातम्। शिक्षायाः उद्देश्यम् संरचना, अध्यापकस्थितिः, अध्यापकानां प्रशिक्षणं, पाठ्यक्रमः, पाठ्यक्रमे त्रिभाषासूत्रम् उच्चशिक्षा इत्यादयो विषया अस्मिन् आयोगे चिन्तिताः।

४) संस्कृतशिक्षा – आयोग :

सुनीतिकुमारचटजीमहोदयस्य आध्यक्ष्ये १९५६ तमे वर्षे संस्कृतशिक्षा – आयोगस्य स्थापना जाता। चतुर्भाषासूत्रस्य स्थापना कक्षा ६ तः १० पर्यन्तं संस्कृतस्य अध्ययनम्, विविधवैज्ञानिकप्रयोगशालानां स्थापना यत्र आधुनिकै :- विद्वद्भिः सह संस्कृतस्य विद्वान्सः यज्ञः इत्यादीनां विषये चर्चा कुर्वन्तु इति अस्य आयोगस्य उदेश्यम् आसीत्

३.७ आर्षकाव्ये

ऋषिणा रचितं काव्यम् आर्षकाव्यम् इति। अस्माकं संस्कृते आर्षकाव्यनाम्ना काव्यद्वयं चिरं प्रतिष्ठितं रामायणं, महाभारतं च। अनयोः द्वयोः अपि आर्षकाव्ययोः परिचयः अत्र दीयते।

रामायणम्

अत्र मर्यादापुरूषस्य पुरूषोत्तमस्य रामचन्द्रस्य चरित्रं प्राणिमात्राय आदर्शभूतं प्रतिपादितमस्ति। अस्य आर्षकाव्यस्य रचयिता महर्षिः वाल्मीकिः इतिः संस्कृतसाहित्ये प्रसिद्धः वर्तते। अस्मिन् आर्षकाव्ये चतुर्विंशतिसहस्त्रं श्लोकाः वर्तन्ते। अस्मिन् आर्षकाव्ये चतुर्विंशतिसहस्त्रं श्लोकाः वर्तन्ते। स्वत्र्चात्र सप्तकाण्डानि अनुष्दुप्छन्दसा सरलतया वर्णितानि सन्ति। रामायणे ये सिद्धान्तः आदर्श च प्रतिपादिताः ते भारतीयां संस्कृति; जनजीवनं च पोषयन्ति। अतः प्रत्येकं गृहे रामायणस्य पाठः अवश्यं करणीयः इति।

माहाभारतम्

द्वितीयम् आर्षकाव्यं नाम ''महाभारतम्'' इति, व्यासमहर्षिणा विरचितस्य अस्य आर्षकाव्यस्य लेखकः आसीत् स्वयं गणपतिः ''पञ्चमवेदः'' इति महाभारतस्य अपरं नाम। महाभारते अष्टादशपर्वाणि सन्ति–आदि–सभा–वन–विराट्–उद्योग–भीष्म–द्रोण–कर्ण–शल्य–सौप्तिक–स्त्री–शान्ति–अनुशासन–आश्वमेधिक–आश्रयवासिक–

मौसल-महाप्रासनिक - स्वर्गारोहणरूपाणि। महाभारतमाध्यमेन व्यासमहर्षिणा एवं प्रमाणीकृतं यत् कृतस्य फलम् आत्मना एव भोग्यम्। सर्वथा न्यायस्य, सदाचारस्य, सत्यस्य च मार्गः अनुसर्तव्यः इति सन्देशं दत्वा विश्ववाङ्ःये महाभारतं मणिः इव चिरं तिष्ठति।

३.८ दीपावली

''उत्सवप्रियाः मानवाः'' भारते अनेके उत्सवाः पर्वाणि च सन्ति। तेषु श्रेष्ठं पर्व दीपावलीः अस्ति। दीपावलीपर्व आनन्दस्य हर्षस्य प्रतिरूपम् अस्ति।

अयोध्यावासिभिः रामस्य लंकातः अयोध्यां प्रति आगमनकाले दीपमालां प्रज्वाल्य स्वागतं कृतम्। दीपावलीः उत्सवः पञ्चदिनानि यावत् प्रचलति। दीपावलीः उत्सवस्य प्रथमदिवसः धनत्रयोदशी भवति, अस्मिन् दिने जनः कुबेरस्य पूजनं कुर्वन्ति। द्वितीयदिनं नरकचतुर्दशी इति उच्यते अस्मिन् दिने श्रीकृष्णेन नरकासुरः हतः। तृतीयदिनं भवति अमावस्यायाः अस्मिन् दिने जनाः दीपप्रज्ज्वलनं कुर्वन्ति। चतुर्थदिनं बलिप्रतिपद् भवति।

दीपावल्याः उत्सवस्य अन्तिम् दिनं भवति यमद्वितीया अस्मिन् दिने भगीनयः स्वभ्रातरं निरंजयन्ति। तेषां सौख्यम् इच्छन्ति। इदं दिनं बन्धुभगीन्यः प्रेमप्रतिकम्। अस्मिन् उत्सवे जनाः नूतनवस्त्राणि धरन्ति मिष्ठान्नं खादन्ति मिष्ठानस्य आदानं प्रदानञ्च कुर्वन्ति।

३.९ संस्कृतभाषा

संस्कृतभाषा सर्वासां भाषाणां जननी। इयं भाषा देववाणी गीर्वाणवाणी नाम्ना अपि प्रसिद्धा अस्ति।

संस्कृतेः मूलं संस्कृतम्। अस्माकं प्राचीनतमं ज्ञानभण्डारं संस्कृतभाषायाम् एव अस्ति। वेदाः उपनिषदः, पुराणानि, ब्राह्मणग्रथाः, आरण्यकानि संस्कृतभाषायाम् एव अस्ति। वेदाः उपनिषदः, पुराणानि, ब्राह्मणग्रथाः आरण्यकानि संस्कृतभाषायाम् एव विलसन्ति। संस्कृतसाहित्यस्य ज्ञानभाण्डारः अगाधम् अतुलनीयं च अस्ति। विश्वविख्यातं रामायणं महाभारतञ्च संस्कृतभाषायामेव शोभते।

महाकविः कालिदासः, भरतः, भवभूतिः, इत्यादिभिः कविभिः इयं भाषा पालिता, लालिता च एतेषां महाकवीनां नाटकानि महाकाव्यानि च संस्कृतभाषा यामेव राजन्ते।

संस्कृतभाषायां सुभाषितानां प्रचुरो ज्ञानभाण्डारो वर्तते। इमानि बोधपरकानि सुभाषितानि मनोरंजकानि अपि सन्ति। संस्कृतेः रक्षंणार्थ संस्कृतस्य रक्षण आवश्यकम् अस्ति अतः संस्कृतस्य रक्षणार्थं सर्वेः रेव यत्नः करणीयः।

३.१० देशभक्तिः

यस्मिन् देशे वयं जन्म अलभम् स हि अस्माकं देशः जन्मभूमिः वा भवति। जननी इव जन्मभूमिः पूज्या आदरणीया च भवति। अस्याः गौरवेण एव देशवासिनां गौरवं भवति। ये जनाः स्वाभ्युदयार्थं देशस्य अहितं कुर्वन्ति ते अधमाः भवन्ति। देशभक्तिः सर्वासु भक्तिषु श्रेष्ठा कथ्यते। अनया एव देशस्य स्वतंत्रतायश्च रक्षा भवति। अनया एव प्रेरिताः बहवः देशभक्ताः भगत-सिंहः, चन्द्रशेखरआजाद प्रभृतयः आत्मोत्सर्गम् अकुर्वन्। झॉसीश्वरी लक्ष्मीबाई, राणाप्रतापः, मेवाड-केसरी, शिववीराः च प्रमुखाः देशभक्ताः अस्माकं देशे जाताः। देशभक्तिः व्याक्ति-समाज-देशकल्याणय परम् औषधम् अस्ति। अतः यः कोऽपि पुरुषः स्वदेशं प्रति भक्तिं न प्रदर्शयेत् सः देशद्रोही इति कथ्यते, अतः अस्माभिः अपि स्वदेशं प्रति सदा आदरः, सम्मानं देशभक्तिः च सम्पानीया। अतः एव उच्यते जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयासी।

३.११ संस्कृते विज्ञानम्

विज्ञानं नाम किम्? उच्यते प्रयोगस्य माध्यमेन कस्यापि विषयस्य सिद्धिः एव विज्ञानमिति कथ्यते। सम्पूर्णविश्वो विज्ञानमेव। भारतदेशे प्राचीनकालादेवविज्ञानम् अस्ति। संस्कृतभाषय। विज्ञानस्य प्रतिपादनं जातमस्ति। संस्कृते

विज्ञानसाहित्यं भारत-देशस्य निधिः वर्तते।

वेदेषु विज्ञानस्य मूलानि सन्ति। तस्मिन् काले एव वृक्षाणां, वनस्पतीनां, महाभूतानां, लोहानां, धातूनां, कृमीणां, योगाणां सूक्ष्माणां पदार्थानां च वर्णनं वेदेषु कृतम्। भाषाविज्ञानविदुषः पाणिनेः अष्टाध्यायी इति ग्रन्थः अधुना अपि विश्वे प्रसिद्धः अस्ति।

वराहमिहिरस्य बृहत्संहिता इति ग्रन्थः प्राचीनस्य विज्ञानस्य उत्तमम् उदाहरणम् अस्ति। भूकम्पः, भूगर्भजलम्, अन्ये अपि विज्ञानस्य विषयाः अस्मिन् ग्रन्थे चर्चिताः सन्ति।

प्राचीनं भारतदेशे कृषिविज्ञानं, कृषिशास्त्रं, वृक्षशास्त्रम् अपि अध्ययनस्य विषयः आसीत्। पाराशरस्य कृषिशास्त्रं शूरपालस्य वृक्षायुर्वेदश्च अन्ये अपि ग्रन्थाः कृषिविज्ञानं, वृक्षाणां वर्धनस्य विज्ञानञ्च वर्णयन्ति।

एवमेव वैमानिकशास्त्रं, रसशास्त्र्, रसायनविज्ञानञ्च प्रसिद्धं वर्तते।

सर्वविज्ञानाधारेण मनुष्याणां जीवनं शुद्धयं शान्तिमयं च कर्तुम् अस्माभिः विज्ञानशास्त्रस्य अध्ययनम् अवश्यं करणीयम्।

३.१२ ग्रन्थालयमहत्त्वम्

ग्रन्थस्य आलयः ''ग्रन्थालयः'' इति उच्यते। तत्र ग्रन्थानां संग्रहो विधीयते। ग्रन्थालये आदानप्रदानयोः व्यवस्था कल्पिता भवति। ग्रन्थालये विभिन्नप्रकारकानि पुस्तकानि संगृहीतानि भवन्ति यथा मुद्रितपुस्तकानि, हस्तलिखितादीनि च एवञ्च वृत्तपत्राणां, मासिक-पाक्षिक पत्रिकादीनां संकलनं कृतं भवति। ग्रन्थालये न केवलं छात्राः अपितु अध्यापकाः विद्वान्सः संशोधकाः अपि स्वकीयज्ञानवृद्धयर्म्, अनुसन्धानार्थ च ग्रन्थालये विद्यमानानां पुस्तकानाम् उपयोगं कुर्वन्ति। ग्रन्थालयं विना एतत् कार्यम् असम्भवमेव।

यथा दीपकाभावे सर्वत्र अन्धकारो दृश्यते तथा ज्ञानरहितस्य मनुष्यस्य कृते सर्वा : दिश : शून्या : भवन्ति। अत एव उच्यते 'ज्ञानं तृतीयं मनुजस्य नेत्रम्' इति।

ग्रन्थालये विभिन्नपुस्तकानां ग्रन्थानाञ्च संरक्षणं सुष्ठु क्रियते। एतादृशे ग्रन्थलये पुसतकानां महत्त्वं सर्वोपरि भवति। ज्ञानस्य रूपमिदं प्राथमिकतया प्राधान्येन च संरक्षणीयम्। अतः प्रत्येकं मनुष्यस्य जीवने ग्रन्थालयस्य अतीव महत्त्वपूर्ण स्थानं भवति।

३.१३ अपेक्षित प्रश्न संच

दीर्घोत्तरी प्रश्न

निबंध लिहा

१) संस्कृत भाषा महत्त्व

२) दीपावली

३) ग्रंथालय

३.१४ संदर्भ ग्रंथ सूची

१. संस्कृत निबंध मंदाकिनी - डॉ. आद्याप्रसाद मिश्र. अक्षयवट प्रकाशन, इलाहाबाद.

२. निबंधमाला - डॉ. लक्ष्मीसागर वार्ष्णेय, लोकभारती प्रकाशन, इलाहाबाद.

३. संस्कृत निबंध शतकम् - डॉ. कपिल देव द्विवेदी, चौखंबा, प्रकाशन, वाराणसी.